CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ५ सोमवार दि. २५ जानेवारी २०२१ ते रविवार दि. ०१ फेब्रुवारी २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

# निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाचा डाव बहुजन विकास आघाडीवर ईडीचा दबाव



विरार/क्राईम रिपोर्टर

सरकारी तपास यंत्रणांना हाताशी धरून विरोधकांना नामोहरण करण्याचा राजकीय खेळ काही नवा नाही आणि पूर्वी जे कॉंग्रेसने केले तेच आज सत्ताधारी भाजपा करीत आहे आणि त्यासाठी ईडी अर्थात अंमलबजावणी संचानलयाचा हत्यारासारखा वापर केला जात आहे. ज्या ज्या ठिकाणी निवडणुका तोंडावर आलेल्या असतात त्या त्या ठिकाणी विरोधकांना नामोहरम करण्यासाठी तसेच प्रादेशिक पक्षांना दाबण्यासाठी भाजपाकडून ईडीचा वापर केला जातो. वसई-विरारमध्ये सुद्धा तेच घडत आहे. ऐन महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर ईडीची गाडी वसई-विरारकडे वळली आहे.

वसई-विरार मधील जमीन घोटाळ्यात जर ईडीला खरोखरच कुणाची चौकशी करायची असेल तर एचडीआयएल सारख्या कंपन्यांच्या माध्यमातून मोठमोठे बेकायदा प्रकल्प उभे करणाऱ्या वाधवान यांच्या सारख्या बड्या धेंडांची! तसेच त्यांना जमिनी घेण्यापासून त्यांचे प्रकल्प उभे करण्यास मदत करणाऱ्या तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि महत्वाचे म्हणजे वाधवान जरी आत असले तरी त्यांच्या सारखे अनेक बडे बिल्डर बाहेर आहेत आणि त्यांनी वसई विरार मधील जमिनी अक्षरशः गोरगरीब आदिवासींना लुबाडून घेतल्या आहेत. त्यावर त्यांचे मोठमोठे हौसिंग प्रोजेक्ट सुरु आहेत. या प्रोजेक्टना आयोडी, सीसीसारख्या बांधकामांसाठी लागणाऱ्या परवानग्या आहेत कि नाहीत याची चौकशी करावी आणि त्यांच्या बेनामी संपतील टार्गेट करावे तरच ईडीच्या हाती मोठे घबाड लागेल.



माझ्यामागे ईडी लागायला तेवढा मी मोठा नेता नाही. पण आज आणि उद्या प्रसार माध्यमांमध्ये नाव आल्याने मी मोठा होणार आहे. ईडीमुळे मोठे बनण्याची नक्कीच संधी मिळते. जे काही आहे ते समोर येईल व चुकीचे केले असेल तर तेही समोर येईल. ईडीने आपले काम करावे मी त्यांना पुर्णपणे सहकार्य करेन.

– आमदार हितेंद्र ठाकूर

महाराष्ट्रात आत्तापर्यंत राज ठाकरेंपासून एकनाथ खडसे यांच्यापर्यंत अनेक नेत्यांची ईडीने चौकशी केली. पण वसई-विरारमध्ये ईडीने जी विवा ग्रुपवर कारवाई केली ती कारवाई म्हणजे साप सोडून भुई थोपटण्याचा प्रकार आहे. भलेही विवाकडे काही बेनामी मालमत्ता सापडलेली असली तरी या वसई तालुक्यात सिडकोपासून महानगरपालिके पर्यंतच्या काळात ...पान ६ वर

# चिमुर्डीची त्याने केली नाही कीव अत्याचार करून घेतला जीव

नांदेड/क्राईम रिपोर्टर



आरोपी बाबू

लैंगिक विकृती हि माणसाला पशु बनवते. कारण अशा माणसाला केवळ त्याची कामवासना शमवायची असते. त्यामुळे तो कुठल्याही वयाच्या महिलेकडे केवळ इच्छापूर्तीचे साधन म्हणून बघत असतो. खास करून ज्यांच्या मनात सतत स्त्रियांचे विचार असतात किंवा ज्यांना स्त्रीसुख मिळत नाही असे वखवखलेले लोक अक्षरशः पशु बनून लहान मुलीवरही झडप घालतात आणि त्यांची शिकार करून आपले पाप लपवण्यासाठी तिचा जीवही घेतात. म्हणूनच बाल लैंगिक गुन्हेगारीच्या विरोधात कठोर कायद्याची गरज आहे. पण आपल्याकडे कठोर कायदेच नसल्याने बळ अत्याचार विरोधी गुन्ह्यांच्या संखेत वाद झालेली आहे. नांदेड जिल्ह्यातील दिवशी गावात एका नराधमाने ५ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून आपले पाप लपवण्यासाठी तिची हत्या केली. मात्र पोलिसांनी त्याला अटक केली असून या नराधमाला तत्काळ फासावर चढवा अशी मागणी संपूर्ण जिल्ह्यातील महिलांनी केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यात दिवशी नावाचे गाव आहे. याच गावात बाबू संगेवार हा एका साधन शेतकऱ्यांकडे सालगाड्याचे काम करतो. मात्र बाबू विकृत मनोवृत्तीचा होता आणि त्याची मालकाच्याच पाच वर्षाच्या मुलीवर वाईट नजर होती आणि एकेदिवशी सदर मुलगी अंगणात खेळत असताना बाबू तिला निर्जन ठिकाणी घेऊन गेला आणि त्याने त्या पाच वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची गळा दाबून हत्या केली. मात्र हे दुष्कृत्य करून तो पळून जात असतानाच गावकऱ्यांनी त्याला पकडून बेदम चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.

# संशयामुळे तिघांनी कुणाचेच नाही ऐकले मित्राचे तुकडे तुकडे करून नदीत फेकले



मयत संजय

इंदापूर/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणसाचा कुणावरही विश्वास राहिलेला नाही. कारण कोण कधी विश्वासघात करील याचा नेम नाही. जिथे नात्यातले केसाने गळा कापतात तिथे मित्रांचे काय. म्हणूनच मैत्री करताना मित्रांना उंबरठ्याच्या बाहेरच ठेवावे, पण काही लोकं मित्रांना चुलीपर्यंत आणतात आणि कुटुंबातील महिलेने त्याच्याकडे नुसते बघितले तरी त्यांना संशय येतो. इंदापूर जवळच्या वावडं येथे अशाच एका घटनेत मनमोकळ्या स्वभावाचा संजय हा मित्रांच्या घरी जायचा. त्यामुळे मित्रांच्या कुटुंबातील महिलांशी त्याचे हसून खेळून बोलणे व्हायचे. तो त्यांना आपल्या गाडीवरून फिरवायचा, मात्र त्याच्या या कृतीचा त्याच्या तीन मित्रांना संशय आला आणि त्या तिघांनी संजयची अत्यंत निर्घुणपणे हत्या केली. त्याचे शीर धडावेगळे करून हात-पाय तोडले आणि मृतदेहाची नदीपात्रात विल्हेवाट लावली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



एका २३ वर्षीय युवकाची जिवलग मित्राच्या नात्यातील महिलांशी जवळकीचा संबंध असल्याच्या संशयावरून धारदार शस्त्राने हात, पाय, शिर धडापासुन वेगळे करत निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही खळबळजनक घटना गणेशवाडी (ता.इंदापूर) येथील ...पान ६ वर

# जन्मदात्या आईला ठार मारायला गेला पण मामेभावाच्या हातून दारुडा मेला

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर



मयत कृष्णा

दारूच्या आहारी गेलेला माणूस कुटुंबासाठी डोकेदुखी ठरलेला असतो. कारण एकतर तो सर्व पैसा दारूवर उडवत असतो आणि दारू पिवून घरी आल्यावर कुटुंबाला छळत असतो. औरंगाबाद जवळच्या आसेगवत राहणारा कृष्ण शेळके याला असेच दारूचे व्यसन जडले होते. जमीन विकून आलेला पैसा आई किंवा पत्नीला देण्याऐवजी तो दारू आणि एका बाईवर उडवत होता. त्यामुळे आईवर मोलमजुरी करण्याची पाळी आली होती. दरम्यान एकदा दारूच्या नशेत असलेल्या कृष्णाचे आई बरोबर भांडण झाले. यावेळी कृष्णाने आईचा गळा दाबून तिला ठार मारण्याचा प्रयत्न करीत असतानाच कृष्णाचा मामेभाऊ धावला आणि त्याने कृष्णाच्या तावडीतून त्याच्या म्हाताऱ्या आईला सोडवून कृष्णाला इतके बेदम मारले कि त्याचा या मारहाणीतच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





तुळसाबाई

कृष्णा शामराव शेळके यास दारु पिण्याचे भारी व्यसन जडले होते. दारु पिणाऱ्या मित्रांची संगत लाभल्याचा तो परिणाम होता. दारुच्या आहारी गेल्यानंतर त्याला कसलेही भान रहात नव्हते. दारुच्या आहारी गेल्यानंतर तो पत्नीला शिवीगाळ करण्यास मागेपुढे बघत नव्हता. कधी कधी तर त्याची आई तुळसाबाईला देखील मारहाण करण्यास तो मागेपुढे बघत नव्हता. ...पान २ वर

# उधारीचे पैसे देण्यास नकार दिला भिवंडीत स्ट्रॉबेरीवाल्याचा खून झाला

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

उसनवारीच्या वादातून एका स्ट्रॉबेरी विक्रेत्याचा खून केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. ही घटना भिवंडी शहरातील वंजारपट्टी नाका, परिसरातील श्रीदेवी ज्वेलर्सच्या दुकानाशेजारी असलेल्या गाळ्यात घडली आहे.

याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात हल्लेखोरांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निजामुद्दीन हजरतद्दीन राईन असे खून झालेल्या स्ट्रॉबेरी विक्रेत्याचे नाव आहे. तर अंसार उर्फ पप्पू मोहरम अली राईन (वय ३५, रा. भिवंडी) सद्दाम हुसैन अनवरअली राईन (रा.भिवंडी) असे खुनाचा गुन्हा दाखल झालेल्या हल्लेखोरांची नावे आहे. तर हे दोघेही खून करून फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. मृत निजामुद्दीन याने आरोपी अंसार उर्फ पप्पू आणि सद्दाम हुसैन यांच्याकडून उधारीवर स्ट्रॉबेरी घाऊक बाजार भावाप्रमाणे घेतली होती. त्यांनतर मृत निजामुद्दीन याने स्ट्रॉबेरीची विक्रीही केली. मात्र आरोपींना उसनवारीची रक्कम परत दिली नाही. त्यामुळे दोन्ही आरोपीने उधारीच्या पैश्यासाठी तगादा लावला असता, मृतक निजामुद्दीन याने उधारीचे पैसे देण्यास नकार देत होता. ...पान ६ वर

# रात्रीच्या अंधारात विवाहितेचा विनयभंग केला स्त्रीलंपट रतिलाल तिघांच्या मारहाणीत मेला



मयत

जळगाव/क्राईम रिपोर्टर

भूख मग ती शरीराची असो कि पोटाची माणसाला स्वस्थ बसू देत नाही. खास करून शरीराची भूक माणसाला जनावर बनवते आणि अशा माणसाची प्रत्येक बाईवर वाईट नजर असते. कारण तिच्यात त्याला भोगदासी दिसत असते. चोपडा येथे रतिलाल माली नावाच्या इसमाची पत्नी त्याला सोडून गेल्याने शरीरसुखासाठी तो वेद झाला होता आणि त्यामुळेच गावातल्या बायकांवर सतत त्याची वाईट नजर असायची. एकदा दारूच्या नशेत तो एका विवाहितेच्या घरात घुसला आणि त्याचा विनयभंग करून घरी पळून आला. मात्र त्या विवाहितेच्या दोन दिरांनी घरात घुसून रतिलाल यास बेदम मारले. विशेष म्हणजे रातीलालच्या धाकट्या भावानेही त्यांना साथ दिली. कारण रातीलालच्या या कृत्याला त्याचा भाऊ सुद्धा कंटाळला होता. म्हणून त्यानेही रतिलाल यास मारले. मात्र या मारहाणीत रातीलालचा मृत्यू झाल्याने त्याच्या भावासह तिन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली.

रतीलालची पत्नी त्याला सोडून माहेरी निघून गेली होती. तिने त्याच्यासोबत काडीमोड केला होता. त्यामुळे एकट्या रतीलालची नजर नेहमी विवाहित महिलांवर रहात होती. दारुच्या नशेत असतांना एखादी विवाहिता मनात भरली म्हणजे तो तिचा विनयभंग करण्यास सरसावत नव्हे तर झेपावत ...पान २ वर

# अनैतिक संबंधामुळे त्याचा संयमाच सरला आईच्या प्रियकराचा मुलानेच गळा चिरला

मुंबई/राजेंद्र वेदांते

समाजात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला त्याची इज्जत प्यारी असते. त्यामुळे आपल्याला कुणी नाव ठेवणार नाही किंवा एखाद्या गोष्टीमुळे अपमानित होऊन आपल्याला मान खाली घालावी लागणार नाही, याची काळजी घेत असतो. त्याच बरोबर आपल्या कुटुंबातील व्यक्तींनी खास करून आई-बहिण, पत्नी यांनी त्यांच्या मर्यादेत राहावे असे त्याला वाटत असते. धारावीत राहणाऱ्या आणि सायन हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या सरळमार्गी दिपकलाही तसेच वाटत होते. मात्र त्याच्या आईचे एका तरुणाशी अनैतिक संबंध सुरु झाल्याने तो अस्वस्थ झाला होता. त्याने आईच्या प्रियकराला अगोदर समजावलं, पण तो काही ऐकत नव्हता आणि एक दिवस घरात दिपकने दोघांना पाहताच त्याचा संयम संपला आणि त्याने आपल्याकडच्या सर्जिकल ब्लेडने आईच्या प्रियकराचा गळा चिरला. मात्र पोलिसांनी खून करून मुंब्र्याला पळून गेलेल्या दीपकला शिताफीने अटक केली.

मुलाने आपल्या आईच्या प्रियकराची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. काही तासातच धारावी पोलीसांनी फरार आरोपीच्या मुसक्या आवळल्या. कधीही ...पान २ वर

# २० वर्षाने लहान असलेल्याला जवळ करून चुकली शरीरसुखाला चटावलेली अभिनेत्री जीवाला मुकली



मयत जया पाटील

सातारा/क्राईम रिपोर्टर

वासनेच्या आहारी गेलेला पुरुष असो कि बाई त्यांना क्षणिक सुखापुढे नितीमत्तेचं भान राहत नाही. अब्रूची चाड राहत नाही आणि समाज काय म्हणेल याचीही भीती वाटत नाही. त्यामुळे शरीरसुखासाठी हपालेले लोक काहीही करायला तयार असतात. काही दिवसांपूर्वी साताऱ्यात एका ५६ वर्षांच्या अभिनेत्रीची हत्या झाली होती. सुरवातीला हि हत्या तिच्या नातेवाईकांनी किंवा भाडोत्र्यांनी केली असावी असा संशय होता. मात्र पोलिसांनी जेंव्हा या प्रकरणातील रहस्य उलगडले. तेंव्हा संपूर्ण सातारा शहर हादरून गेले. या महिलेचे तिच्या पेक्षा २० वर्षांनी लहान असलेल्या एका तरुणाशी अनैतिक संबंध होते आणि ती सारखी शरीर सुखासाठी त्याला सतावत असल्याने त्यानेच तिचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

ज्येष्ठ अभिनेत्री जया पाटील (वय ५६, रा. गजानन हौसींग सोसायटी, कृष्णानगर, सातारा) यांचा खून अनैतिक संबंधातून झाला असून, हा खून कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड (मावेली) येथील आनंत दाजीबा पेडणेकर (वय ३३) या युवकाने केला असल्याचे तपासात उघड झाले. पोलिसांनी पेडणेकर याला अटक केली असून, त्याला न्यायालयाने आठ दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. विविध मालिका आणि वेबसिरीजमध्ये काम करणाऱ्या ...पान ६ वर

# थोरल्या दिराकडून भलतेच झाले वहिनीसाठी पत्नीलाच ठार केले

जालना/क्राईम रिपोर्टर



विवाहबाह्य अनैतिक संबंध कधीना कधी उघडकीस येतातच आणि एकदा का ते उघडकीस आले कि घरात संसारात कलह सुरु होतो. या काळातून कधीतरी पती पत्नी पैकी कुणाचा तरी जीवही जाऊ शकतो. कारण पती पत्नीच्या विश्वासाच्या नात्याला अनैतिक संबंधामुळे तडा गेलेला असतो आणि त्यातून त्या दोघांमध्ये दुरावा निर्माण झालेला असतो, अशा स्थितीत एकमेकांवर सूड घेण्याची भावना त्यांच्यात निर्माण होते आणि त्यातून संसार आणि त्यांचे आयुष्यही उध्वस्त होते. जालना जिल्ह्याच्या कुंभारी गावातील एका इसमाचे त्याच्या धाकट्या वहिनिशीच अनैतिक संबंध होते आणि त्याच्या पत्नीने एकदा दोघांना रंगेहात पकडले. त्याचा त्या इसमाला इतका राग आला कि त्याने पत्नीची हत्या करून स्वतःही विष पिवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला वाचवण्यात डॉक्टरांना यश आले असून पोलिसांनी या आरोपीस अटक केली आहे. ...पान २ वर

# इनरवेअरच्या जाहिरातदाराने टाकले जाळे मॉडेलिंगचे आमिष दाखवून ब्लॅकमेल केले

अहमदाबाद/क्राईम रिपोर्टर

सध्याचे युग हे जाहिरातीचे युग आहे. त्यामुळे प्रसिद्धीचा हव्यास असलेल्या अनेक तरुणींना मॉडेलिंगचे आकर्षण असते आणि मॉडेलिंगची संधी मिळण्यासाठी काही तरुणींची अंगावरचे कपडे उतरवण्याची सुद्धा तयारी असते आणि याचाच फायदा या क्षेत्रातील काही भामटे घेतात. लेडीज इनरवेअरची जाहिरात करणाऱ्या अशाच एका भामट्याने काही तरुणींना मॉडेलिंगचा झासा देऊन त्यांचे न्यूड फोटो मागवून घेतला आणि नंतर त्यांना ब्लॅकमेल करू लागला. मात्र एका तरुणीने धाडस करून त्याच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवतच पोलिसांनी या भामट्याला अटक केली.

सुरज गवळी हा २५ वर्षीय तरूण अहमदाबाद शहरातील चांदखेडा परिसरात आपल्या कुंटूंबासह राहतो. त्याने आपले ग्रॅज्युएशनचे शिक्षण पूर्ण करून मार्केटिंगच्या क्षेत्रात एका खाजगी कंपनीत नोकरी करू लागला होता. ती कंपनी लेडिज इनरवेअर तयार करणारी गारमेंट कंपनी होती. त्या कंपनीचा विस्तार ही मोठा होता. त्यांनी लेडिज इनरवेअरच्या मार्केटिंगसाठी सुरज सारखे अनेक तरूण नेमले होते. त्यांना त्या कंपनीमार्फत पगार ही चांगला होता. मार्केटिंग करत असताना त्याना दर महिन्याला टार्गेट दिले जायचे. ते टार्गेट पूर्ण करण्याची जाबाबदारी ही प्रत्येक फिल्ड ऑफिर्सवर असायची. सुरज गवळी याचे व्यक्तीमत्व ही देखणे होते. तो आपल्या लाघवी बोलण्याने समारेच्यावर लगेच आपली छाप पाडत होता.त्यामुळे महिन्याला त्याचे ...पान ६ वर

CMYK

25 JAN TO 01 FEB 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 23/01/2021 8:32 PM Page 1



पान १ वरून....

## जन्मदात्या आईला ठार मारायला ...

त्यामुळे त्याची आई व पत्नी त्याला कंटाळून गेले होते. दिवसेंदिवस त्याचा त्रास वाढतच होता. आसेगाव येथे शेळके परिवार रहात होता. या परिवारात कृष्णा हा विवाहीत तरुण रहात होता. लग्न झाल्यानंतर त्याचा दारुचा नाद कमी होईल अथवा सुटून जाईल असा विचार त्याच्या आई व नातेवाईकांनी केला होता. मात्र लग्नानंतर देखील त्याचे दारुचे व्यसन काही केल्या कमी होत नव्हते. कृष्णाच्या नावावर पावने दोन एकर शेती होती. त्यातील काही शेती तलावात गेली होती. उर्वरीत शेती त्याने दारुच्या नादी लागून विकून टाकली होती. त्यामुळे त्याच्या हातात पैसा खुळखुळत होता. हाती पैसा आल्यामुळे त्याला जास्तच चेव आला होता. शेती विकून त्याच्या हाती पाच लाख रुपयांची रोकड आली होती. दरम्यान त्याची ओळख एका महिलेसोबत झाली होती. तो घरात पत्नीला पैसे देण्याऐवजी त्या परक्या महिलेला पैसे देत होता. तो तिच्यावर पैसे उधळत होता. त्यामुळे त्याची आई तुळसाबाई त्याला जाब विचारत असे. कुणी जाब विचारला म्हणजे त्याला भलता राग येत असे. घरात पत्नीला व संसाराला पैसे देण्याऐवजी तो मैत्री झालेल्या महिलेवर पैसे उधळत होता. त्यामुळे साहजीकच त्याला आई व पत्नीकडून विचारणा होत असे. त्यातच तो दारुच्या जास्तच आहारी गेला होता. दारुच्या नशेत तो कुणाला काहीही बोलत असे. त्यामुळे घरातील सर्वच जण त्याल त्रस्त झाले होते. त्यामुळे त्याची आई नाईलाजाने दुस-याच्या शेतात मोलमजुरी करण्यासाठी जात असे. निव्वळ मुलाच्या अशा वागण्यामुळे व तो घरात पैसे देत नसल्यामुळे त्याच्या आईला मोलमजुरी करण्यासाठी जाण्याची दुर्दैवी वेळ आली होती.

आता त्याच्याकडे केवळ विस गुंठे शेती शिल्लक राहिली होती. आता तर तो राहते घर देखील विकण्याच्या तयारीत होता. त्याच्या अशा बेताला वागण्यामुळे त्याची आई त्याला नेहमीच जाब विचारत असे. मात्र त्याच्यात कोणताही बदल अथवा सुधारणा होत नव्हती. दिवसेंदिवस त्याची दारुची नशा कमी होण्याचे नाव घेत नव्हती. ३ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. या दिवशी नेहमीप्रमाणे कृष्णाने दारु पिण्याचा कार्यक्रम पार पाडला. दारुच्या नशेत तर्रर होवून डुलत डुलत तो घराच्या दिशेने आला. घरात आल्यानंतर त्याच्या आईने त्याला विचारणा केली. मात्र अगोदरच तो मद्याच्या भलताच आहारी गेला होता. त्याला काहीही सुचत नव्हते. जाब विचारणा-या आईचा त्याला राग आला. रागाच्या भरात त्याने आतुन दार लावून घेतले. आता तर त्याने थेट आई तुळसाबाईलाच मारहाण करण्यास सुरुवात केली. साठ वर्षाच्या आईला घरात कोंडून तो मारहाण करु लागल्याने साहजीकच त्या माऊलीने जिव वाचवण्यासाठी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. माऊलीचा आक्रोश ऐकून कृष्णाचा मामेभाऊ पंढरीनाथ बाबुराव जाधव हा पळत पळत आला. त्याने बंद घराला धडक देण्यास सुरुवात केली. कसाबसा त्याने दरवाजाचा एक हिस्सा तोडण्यात यश मिळवले. त्या लहानशा तुटलेल्या दरवाजाच्या जागेतून त्याने आत प्रवेश करत तुळसाबाईला कृष्णाच्या तावडीतून सोडवले. रागाच्या भरात पंढरीनाथ व तुळसाबाई या दोघांनी दारुच्या नशेतील कृष्णाला मारहाण करण्यास सुरुवात केली. पंढरीनाथ याने तुटलेल्या दाराची फळी हातात घेतली.

त्या फळीनेच त्याने कृष्णाला मारहाण सुरु केली. त्यात त्याच्या डोक्याला व गुप्तांगाला मार बसला. त्यामुळे दारुच्या नशेतील कृष्णा जागेवरच कोसळला. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान गल्लीतील लोक जमा झाले होते. कृष्णा त्याची आई तुळसाबाईचा गळा दाबण्याच्या तयारीत असतांना प्रसंगावधान राखत पंढरीनाथ आत आला व त्याने तुळसाबाईचा जीव वाचवला. तुळसाबाईचा जीव वाचला खरा मात्र नंतरच्या संतापाच्या भरातील मारहाणीत कृष्णाचा जीव गेला. या घटनेची माहिती मिळताच दौलताबाद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरु केली. मयत कृष्णाची पत्नी वंदना शेळके हिच्या फिर्यादीनुसार त्याची आई तुळसाबाई व त्याचा मामेभाऊ पंढरीनाथ जाधव या दोघांवर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. दौलताबाद पोलिसांनी दोघांना अटक केली. सहायक पोलिस आयुक्त विवेक सराफ, निरीक्षक राजश्री आढे, सहायक पोलिस निरीक्षक ए.बी. तडवी, उपनिरीक्षक रवी कदम आदींनी घटनास्थळी भेट दिली. त्यावेळी कृष्णा रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडलेला होता. त्याला दवाखान्यात दाखल नेण्यात आले मात्र तो मयत झालेला होता. डॉक्टरांनी तपासून त्याला मयत घोषित केले. तुळसाबाई आणि पंढरीनाथ या दोघांना अटक करण्यात आली.

## रात्रीच्या अंधारात विवाहितेचा विनयभंग...

असे. त्याचे आई वडील व लहान भाऊ प्रदीप यांना रतीलालचे कारनामे त्रासदायक ठरत होते. त्याच्या तक्रारी घरापर्यत येत होत्या. त्यामुळे त्या तक्रारींचा मुकाबला करणे त्याच्या आईवडीलांना नाकेनऊ येत होते. रतीलालचा भाऊ प्रदीप हा अविवाहीत होता. रतीलालच्या कारनाम्यांची ख्याती गावात आणि समाजात पसरली होती. रतीलालच्या करतुती लक्षात घेत समाजाबांधव या घरात सुन म्हणून मुलगी देण्यास मागे पुढे बघत होते. त्यामुळे रतीलालचा लहान भाऊ प्रदीपचे लग्न जुळण्यास अडचणी येत होत्या. रतीलालची पत्नी काडीमोड घेत माहेरी निघून गेली होती. हा भाग देखील उपवर मुलींचे नातेवाईक लक्षात घेत होते.

रतीलालचे गावातील वर्तन उपवर मुलींच्या पालकांच्या कानावर विविध माध्यमातून पडत होते. उपवर मुलींचे पालक या कुटूंबाची पार्श्वभुमी लक्षात घेत होते. त्यामुळे उपवर प्रदिपचा विवाह जुळण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येत होत्या. रतीलालच्या वर्तनावर त्याचा लहान भाऊ प्रदीप मोठ्या प्रमाणावर नाराज होता. रतीलालने त्याचे वर्तन दुरुस्त करुन घ्यावे आणि चांगले रहावे अशी सर्वांचीच इच्छा होती. रतीलाल यास समजावण्याचा अनेकांनी प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही. ४ जानेवारीच्या रात्री तो रहात असलेल्या गावातील २१ वर्षाची विवाहिता त्याच्या मनात भरली होती. ती घरात एकटी असल्याचे त्याला समजले. मद्याच्या नशेत त्याने थेट त्या विवाहितेचे घर गाठले. ती विवाहीता घरातील बेडवर एकटीच पहुडलेली होती. मधुशाळेतील मधुरस घेतलेल्या रतीलालने थेट तिचा बिछाना गाठला व तिच्या शेजारी जावून पडला. रात्रीचे साडेबारा वाजुन गेले होते. एवढ्या रात्री आपल्या शेजारी कुणीतरी झोपल्याचे त्या २१ वर्षाच्या विवाहितेला जाणवले. रतीलालच्या मुखातून येणारा मद्याचा उग्र दर्प सहन न झाल्यामुळे तिला जाग आली. कुणीतरी अनोळखी आपल्या शेजारी झोपल्याचे समजताच तिने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. त्या विवाहितेच्या ओरडण्याचा आवाज ऐकून तिचे दोघे दिर तेथे पळत आले. दरम्यान मद्याच्या नशेतील रतीलाल सावध होत तेथून पलायन करण्यात यशस्वी झाला. त्याने शिताफीने आपले घर गाठले व घराचा दरवाजा आतून लावून घेत झोपी गेला. त्याचे आईवडील व लहान भाऊ प्रदिप असे जेवण आटोपून केव्हाच झोपी गेले होते.

दरम्यान मध्यरात्रीच्या वेळी विनयभंग झालेल्या महिलेने रणकंदन सुरु केले होते. तिचे दोन्ही दीर रागाने लालबुंद झाले होते. आपल्या भावाच्या पत्नीचा विनयभंग झाल्यामुळे त्यांनी हातात काठी घेत रतीलालच्या घरी जाण्याची तयारी केली. विवाहीतेचे दोन्ही दिर रतीलालच्या घराजवळ आले. त्यांनी रतीलाल यास आवाज देण्यास सुरुवात केली. तुझा भाऊ रतीलाल हा आमच्या वहिनीजवळ ती एकटी असतांना आला होता. त्याने तिचा विनयभंग केला असल्याची माहीती दोघा तरुणांनी प्रदिप यास तावातावात दिली. विवाहितेच्या दोघा दिरांचे बोलणे ऐकून प्रदिप यालादेखील रतीलालचा राग आला. तरीदेखील प्रदीपने त्यांना समजावले की रतीलाल आता मद्यप्राशन करुन आलेला आहे. तो मद्याच्या नशेत आहे. आपण सकाळी या विषयावर बोलू.

मात्र रागाने लालबुंद झालेल्या दोघांनी प्रदिपचे बोलणे ऐकले नाही. दरम्यान दोघांनी थेट घरात प्रवेश करत मद्याच्या नशेतील रतीलाल यास मारझोड करण्यास सुरुवात केली. दरम्यान रतीलालचा बचाव करण्यासाठी गावातील दोघे तरुण प्रयत्न करत होते. त्यांना रतीलालची किव आली होती. मात्र विनयभंग झालेल्या विवाहितेच्या दोघा दिरांनी संतापच्या भरात रतीलाल यास मारहाण सुरुच ठेवली. रतीलालमुळे प्रदिपचे लग्न जुळण्यास अडचणी येत होत्या. त्याच्यामुळे कुटूंबाची बदनामी थांबत नव्हती. त्यामुळे प्रदीपचा देखील राग उफाळून आला. सख्खा भाऊच भावाला मारण्यास आता सरसावला होता. प्रदीपने देखील भाऊ रतीलाल यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली व दोघांना साथ दिली. संतापाची लाट ओसरेपर्यंत दोघांसह प्रदिपने देखील सख्खा भाऊ रतीलाल यास मारहाण केली. त्यानंतर विनयभंग झालेल्या विवाहितेचे दोघे दीर त्यांच्या घरी निघून गेले. त्यानंतर प्रदीपने रतीलाल यास तशाच अवस्थेत अंगावर पांघरुन टाकून झोपवून दिले व तो देखील झोपून गेला. चेह-यासह अंगावर लाथाबुक्क्यांसह काठीचा मार बसल्यामुळे जखमी झालेला रतीलाल अर्धमेला झाला होता. सुर्योदयापुर्वीच त्याने आपला जिव सोडून दिला. रतीलालने ५ जानेवारीचा सुर्योदय पाहिलाच नाही. रतीलाल हे जग सोडून कायमचा देवाघरी गेला होता. आपल्याच भावाला मारहाण करण्यात आपला सहभाग असल्याचे लपवण्याचे मनाशी ठरवत प्रदिपने सकाळी चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशन गाठले. चौघांच्या मारहाणीत भाऊ रतीलालचा मृत्यू झाल्याचे प्रदिपने स.पो.नि. संदिप आराक यांना सांगितले. त्या चौघांमधे विनयभंग झालेल्या विवाहितेचे दोघे दिर आणि मारहाण सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा निरपराधांची नावे त्याने कथन केली. अशा प्रकारे चौघा जणांची नावे सांगत प्रदिप माळी याने स्वत:चे नाव मात्र लपवून ठेवले.

मारहाणीत रतीलाल माळी याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट होते. मात्र त्याला मारहाण करणाऱ्यांमधे त्याचा सख्खा भाऊ प्रदिप हा देखील होता. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनला चौघा जणांची नावे फिर्यादीत घेण्यात आली. त्यात विनयभंग झालेल्या विवाहितेचे दोघे दीर व इतर दोघे जण होते. प्रदिप माळी याने दिलेल्या फिर्यादीनुसार चौघांविरुद्ध चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ४/२१ भा.द.वि. ३०२, ४५२, ३२३, ५०४, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या खून प्रकरणाचा तपास सुरु असतांना चोपडा उप विभागाचे पोलिस उप अधिक्षक राजेंद्र रायसिंग हे स्वत: तपासकामी गावात ठाण मांडून बसले. त्यामुळे स.पो.नि. संदिप अराक यांनी देखील आपल्या सहकाऱ्यांसह स्वत:ला तपासकामी झोकून दिले. तपासात साक्षीदार व गावक-यांकडून मिळालेल्या माहितीनुसार रतीलाल माळी याने यापुर्वी देखील गावात महिलांची छेडखानी केली होती. गावात व समाजात रतिलालमुळे त्याच्या परिवाराला बदनामीचा सामना करावा लागत होता. त्यामुळे प्रदीपचे लग्न जुळण्यात खुप अडचणी येत होत्या. त्या रागाच्या भरात प्रदीपने विवाहितेच्या दोघा दिरांसोबत सख्खा भाऊ रतीलाल यास बेदम मारहाण केल्याचे तपासात उघड झाले. प्रदीपने सख्खा भाऊ रतीलालच्या छातीवर, मानेवर व गुप्तांगावर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तपासात पुढे आले. त्यामुळे फिर्यादी हादेखील आरोपीच्या पिंज-यात आला. फिर्याद देणा-या प्रदिप माळी विरुद्ध पुरावे जमा होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे फिर्याद देणा-या प्रदीप माळी याला आरोपी करण्यात आले. तसेच संशयीत म्हणून त्याने दिलेल्या इतर दोघा तरुणांची देखील तपासणी करण्यात आली. त्यात गावातील इतर दोघा तरुणांनी मारहाणीस प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला असल्याचे उघड झाले. त्यांची मारहाणीत कोणतीही भुमिका नसतांना त्यांची नावे नाहक गोवण्याचे काम फिर्यादी व तपासातील आरोपी प्रदीप माळी याने केले होते.

त्यामुळे विनयभंग झालेल्या विवाहितेच्या दोन्ही दिरांसह फिर्यादी (आरोपी) प्रदीप माळी अशा तिघांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला तिघांना पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याच्या तपासकामी चोपडा उप विभागाचे पोलिस उप अधिक्षक राजेंद्र रायसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. संदिप अराक व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक अमर विसावे, पो.हे.कॉ. राजू महाजन, पो.हे.कॉ. भरत नाईक, पो.हे.कॉ. सुनील जाधव,पो.ना. देवीदास इशी, पोलिस नाईक संदिप धनगर, पोलिस नाईक विकास सोनवणे, पोलिस नाईक विष्णू भिल, पोलिस नाईक रितेश चौधरी, पो.कॉ. सुनिल कोळी यांनी सहभाग घेतला.

## अनैतिक संबंधामुळे त्याचा संयमाच...

अनैतिक संबंधाचे परिणाम हे भयंकर घातक असतात हे आपण कित्येकदा पाहिले आहे. याच अनैतिक संबंधामुळे अनेक जीव हकनाक गेले आहेत. कधी प्रियकरशी संधान बांधून पत्नीने आपल्या पतीची हत्या केली आहे तर कधी पतीने परस्त्रीशी संबध प्रस्थापित करून आपल्या पत्नीला यमसदनी धाडले आहे. चारित्र्याच्या संशयावरून ही असंख्य महिलांचे खून झाले आहेत.या करीता हे अनैतिक संबंध म्हणजे धोक्याची घंटा आहे. कुटुंबियाची वाताहत होते तरीही काहि पुरूष आणि स्रीया या अनैतिक संबधाची चव घेण्यास उत्सुक असतात.परंतु याचा शेवट हा अघटीतच असतो. यात कुणाचा ना कुणाचा मुडदा पडतोच.

दिपक खटरमोल हा सायन हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदन विभागामध्ये कार्यरत आहे. घर नोकरी हेच त्याचे जग होते. साधा, सरळ दिपक नोकरीत आपली छाप पाडून होता.कुणाच्या आद्यात-मध्यात न जाणारा दिपक शांत स्वभावाचा होता. त्याचे आईवर खूप प्रेम होते.त्याची आई ही दिपकला जिवापाड जपत होती.हे माय-लेक धारावी भागात राहत होते. कोरोनाच्या काळात हि हे अत्यंत सुखात जिवन जगत होते. घरात कशाचीच कमतरता नव्हती. परंतु कधी कधी अशा सुखी संसाराला कुणाची तरी दृष्ट लागते. नजरबाधा झाली की होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. दिपकच्या बाबतीत नेमके हेच घडले.

दिपकच्या आईची ओळख धारावी भागात राहणार्या सचिन कुंचीकुर्वे या तरूणा बरोबर झाली. त्यांच्या नजरेच्या खेळातून हे दोघे एकमेकांत कधी गुंतुन गेले हे त्यांना देखील कळले नाही. सुरुवातीला एकमेकांकडे बघून स्मितहास्य करीत असताना दोघांनी ओळख वाढवून बोलणे सुरू केले. मोबाईल नंबराची देवान-घेवान झाल्यानंतर हे दोघे अधिकच जवळ आले. वेळ मिळेल तेंव्हा हे दोघे तासनतास बोलत असायचे.कुणावरही भुरळ पडेल अशी दिपकची आई देखणी होती. तारुण्याचा बहर अजून तसाच होता. भरगच्च शारीरिक बांधा शरीरावरचे उंचवट्यामुळे तिचा देखणेपणा अधिकच खूलून दिसत होता. तिची नजर ही भिरभिरणारी होती.तिच्या त्या नजरेत सचिन अडकला होता. तिने माक्सने चेहरा झाकला तरी तिच्या नजरेतील जादूने सचिनला घायाळ केले होते. दोघांचे संभाषण वाढत गेल्यानंतर कालांतराने या दोघांचे अनैतिक संबंध सुरू झाले. त्यांना वाटत होते कि आपले हे संबंध चोरी चोरी चुपके चुपके सुरू आहेत. म्हणून हे बिंनधास्त होते.शारीरिक वासनेची दोघांची भूख मिटत होती. प्रत्येक वेळी ते सुखाचे केंद्रबिंदू गाठत होते. आपली वासना शमवण्यासाठी ज्या ज्या वेळी सवड मिळेल त्या त्या वेळी हे दोघे एकत्र येत होते. सर्व काही सुरळीत चालू होते.वेळ मिळेल तेंव्हा हे दोघे एकत्र येत होते. दिवसेंदिवस त्याच्या प्रेमाचा अंकुर आकार घेत होता. आपण अत्यंत सावधपणे हे संबंध ठेवले आहेत याची कुणकुण कुणालाच लागली नाही परंतू हे गुप्त ठेवताना हे दोघे सावध होते.

मांजर डोळे मिटून दुध पित असली कि तिला वाटते आपल्याला कुणी पाहत नाही.परंतु सचिन व दिपकच्या आईच्या या लफड्याची चाहूल शेजारच्यांना लागलीच होती. शेजारी दबक्या आवाजात या दोघांची चर्चा करीत होते. परंतु याची खबर सुरुवातीला दिपकला नव्हती.तो अनिभज्ञ होता. एक दिवस दिपकच्या ऐका जवळच्या सहकार्याने सचिन आणि दिपकच्या आईची लफडे असल्याची माहिती तेल-मिठ लावून फोडणी देत दिपकला सांगितली. ते एकून दिपकच्या कानात ऊकळते तेल टाकल्या सारखी त्याची परिस्थिती झाली. कमी बोलणारा, शांत स्वभावाचा दिपक नावाप्रमाणे पेटून उठला होता. परंतु आपल्या आईने आपल्याला लाडात वाढवले आहे.आपल्याला म्हणेल ती भेट वस्तू दिली आहे. माझे पालनपोषण करताना आयुष्यात ती कुठेच कमी पडली नाही.हा सारासार विचार केल्यावर आईला या लफड्याबद्दल बोलायची त्याची हिम्मत झाली नाही. म्हणून तो संयम राखून होता. मात्र अलिकडे आईचा प्रियकर सचिन यांची चर्चा जोर धरत होती. या प्रकरणामुळे तो खूप अस्वस्थ होता.एक दिवस त्याने सचिनला गाठून याबाबत अत्यंत कठोर शब्दात सक्त ताकीद दिली होती. त्याला वाटले यावर सचिनमध्ये काही सुधारणा होईल पण तसे घडले नाही. सचिनवर दिपकची मात्रा कामी आली नाही.

रविवारी (२७ डिसेंबर) रोजी दिपक रात्री उशिरा कामावरुन घरी आला. त्यावेळी आई सोबत सचिन घरी असल्याचे त्याला दिसले. ते दोघेही जवळ बसून पती-पत्नीसारखे गप्पा मारत बसले होते. हे पाहून दिपकचा राग अनावर झाला.त्यावेळी सचिन व दिपक मध्ये वादावादी झाली. हा वाद इतका विकोपाला गेला की, दोघांनी एकमेकांची शर्टाची कॉलर पकडून हाणामारी सुरू केली. त्याचवेळी दिपकने रुग्णालयातून आणलेल्या सर्जिकलच्या धारधार ब्लेडने सचिनचा गळा चिरला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. सचिन रक्ताच्या थारोळ्यात तडफडत पडल्याचे पाहून दिपक व त्याची आई घाबरले. रागाच्या भरात आपल्या हातून खून झाल्याची जाणीव दिपकला आली होती. या घटनेनंतर आरोपी दीपक आणि त्याची आई या दोघांनी घटनास्थळावरुन पळ काढला. पोलीस आपल्याला पकडतील अशी भिती त्यांना सतावू लागली होती. म्हणून त्यांनी आपले मोबाईल बंद करून मुब्र्यातील ऐका नातेवाइकाच्या घरी आश्रय घेतला होता.

मात्र धारावी पोलिसांनी कसोशीने तपास करीत आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली. त्यानंतर अवघ्या काही तासातच पोलीस आरोपींपर्यत पोहचले. पोलीसांनी लागलीच आरोपीच्या मुसक्या आवळल्या. या घटनेच्या दिवशी आरोपीची आई आणि मृत सचिन यांच्यात अनैतिक संबंधावरून जोरदार वाद झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## थोरल्या दिराकडून भलतेच झाले...

भोकरदन तालुक्यातील कुंभारी येथील रतन साळवी याचा विवाह गेल्या वीस वर्षापूर्वी नळणी बुद्रक येथील पगारे यांची मुलगी आशा हिच्याबरोबर झाला होता. या दोघांचा संसार बहरत फुलत असताना त्याच्या संसार वेलीवर दोन फुले उमलली. त्यांची दोन्ही मुले मंगेश आणि वर्षा ही आता मोठी झाली होती.तरीही त्या दोघांचा संसार हा पैलतीरी लागला नव्हता. दोघा नवरा बायकोचे अलिकडच्या काळात सारखी भांडणे होत होती. रतन साळवी याची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने तो आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह मोलमजुरी करून करीत होता. वर्षातून पाच सहा महिने तो पत्नी आशासह बाहेरगावी मोलमजुरीसाठी जात असल्याने याच दरम्यान अलिकडे तो आपल्या कुंभारी गावी सारखा येऊन राहू लागला होता. याला कारण ही तसेच होते. रतन साळवी याचे लहान भावजेय (माया) काल्पनिक नांव हिच्यासोबत विवाहबाहय अनैतिक संबंध जुळले होते.तो तिला चिकटला होता. त्या दोघांच्या संबंधाची कल्पना रतनची पत्नी आशा हिला आलेली होती. म्हणून ती पती रतनबरोबर सारखी भांडण करीत होती. या भांडणातून आशा ही सारखी आपल्या माहेरी म्हणजे नळणी बुद्रक येथे भावाकडे दोन दोन तीन महिने जाऊन राहत होती.

रतन याचे भावजेय मायाबरोबर विवाहबाहय अनैतिक संबंध असल्याने तो पत्नी आशा पेक्षा मायाकडेच जास्त लक्ष देत होता.या कारणातून त्याचे आपल्या बायको मुलाच्याकडे दुर्लक्ष झालेले होते.तो त्यांना भांडण काढून मारहाण करीत होता. त्या दोघा नवरा बायकोचे पटत नव्हते. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून गावात कामधंदा नसल्याने गेल्या काही वर्षापूर्वी रतन साळवी हा पत्नी मुलासह औरंगाबाद जवळील वडगाव कोल्हाटी येथे जाऊन राहू लागला होता. तरीही तो कोल्हारी येथून मायाला भेटण्यासाठी आपल्या कुंभारी गावी अधून मधून जात येत होता. याचा राग आशा हिला येत होता. ती त्याच्याबरोबर त्यावेळी भांडण काढीत होती. पण तरींही तो तिचे काही ऐकत नव्हता. त्याला भावजेय मायाची चटक लागलेली होती. तिला भेटून तिच्याबरोबर शारीरिक सुख घेऊनच तो येत होता. त्या दोघांचे संबंध हे उघड उघड होते. माया ही त्याला तशी साथ देत होती. त्या दोघांचे संबंध वाढीस लागल्याने आशाची मात्र फरफट होत होती. त्याचे संसारकडे, मुलाबाळा कडे अजिबात लक्ष नव्हते. म्हणून ती त्याच्यावर चिडून होती. भांडणे काढत होती. रागाने आपल्या माहेरी जात होती.

आशापेक्षा माया त्याला त्यासंबंधात बरी वाटत होती.म्हणून तो भांडणात कधी कधी चिडून तू तर आता म्हातारी झाली आहेस अशी खोपरखळी मारत होता. त्यामुळे ती त्याच्यावर जास्तच चिडत होती. आपल्या नवऱ्याचे आपल्या लहान जावेसोबत संबंध असून त्यातून नवरा रतन हा आपल्याबरोबर सारखा भांडण काढून मारहाण करीत असल्याची तक्रार माहेरी भावाकडे केलेली होती. त्याने ही आपला दाजी रतन याला याबाबत बऱ्याच वेळेला समजावून सांगितले होते. परंतू त्याला मायाच त्याकामासाठी पाहिजे असल्याने तो कोल्हाटी येथून काही तरी निमित्य काढून कुंभारी येत होता. तो गावी आला म्हणजे माया ही त्याच्याशी लगट करीत लाडीगोडी लावत भावोजी, भावोजी करीत होती. ती त्याच्या लहान भावाची बायको असल्याने तो तिला मायाच म्हणत होता.घरात कुणी नसताना तो तिला जवळ घेऊन तिच्याशी शय्यासोबत करायाचा.म्हणूनच त्या कामासाठीच तो सारखा कुंभारी येथे येत होता.

१५ जानेवारी २०२१ रोजी महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणूका असल्याने रतन त्याची पत्नी आशा मुलगा मंगेश आणि मुलगी वर्षा हे सर्वजण कोल्हाटी औरंगाबाद येथून मतदानासाठी म्हणून आदल्या दिवशी कुंभारी येथे आले. ते फक्त निमित्य होते. खरे कारण तर मायाला भेटण्याचेच होते. त्या दिवशी घरात कुणी नसल्याचे बघून रतन हा मायाशी लगट करीत होता. ते दोघे ही आतील खोलीत निर्वस्त्र अवस्थेत काम करताना आशाला दिसून आले. तिने त्या दोघांना रंगेहात पकडले होते.त्यावरून तिने मायाला तर बोललेच शिवाय नवरा रतन याला चांगलेच फैलावर घेतले होते. आतापर्यत रतन हा आशाला तु उगाच आमच्या दोघांच्यावर संशय घेतेस. आमच्या दोघांत तसले कोणतेही संबंध नाहीत असे वारंवार सांगायचा, पण त्या दोघांचे अनैतिक विवाहबाहय संबंध होते. हे फक्त आशाला माहित होते. म्हणून ती त्याच्याबरोबर सारखे भांडण काढीत होती. आता तर त्या दोघांना तिने रंगेहात पकडले असल्याने त्यावर शिक्कामोर्तबच झाले होते.

त्यावेळी तिने घरच्या इतर लोकांना बोलावून मायाला व रतनला चांगलेच बोल सुनावले होते. त्या दोघांची तिने चारचौघात अब्रुच काढली होती. त्यावेळेपुरते रतन गप्प बसला होता. परंतू रात्रीच्या वेळी परत त्या दोघा नवरा बायकोत याच विषयावरून जोरात भांडण सुरू झाले. त्या भांडणात तो आशाला मारहाण करीत होता. अगोदरच तिने दुपारी त्या दोघांना रंगेहात पकडून त्याची धिंड काढली होती याचा राग त्याला आलेला होता.दुपारचा राग तो आता काढत होता. खोलीत ते दोघेच असल्याने त्याच्या भांडणाला जोर चढला होता. मुले मोठी झाली आहेत. जरा तरी चांगले वागा. हे असले चाळे तुम्हाला शोभतात का?म्हणून ती त्याला विचारीत भांडत होती. त्याला तिचा राग आलेला होता. आता आपली कशी ही अब्रु गेली आहे.आपल्या आणि मायाच्या त्या संबंधात आशाचा अडसर ठरणार आहे. आशा जोपर्यंत आहे तोपर्यंत मायाला आपल्याला भेटता येणार नाही याची त्याला खात्री पटली. म्हणून त्या भांडणात त्याने आशाच्या डोक्यात जवळच पडलेल्या लाकडी दांडका घेऊन घातला. त्यासरशी ती जोरात किचांळून जमीनीवर पडली. तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला. तिचा जागीच मृत्यू झाला. आपल्या मारहाणीत पत्नीचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच तो भानावर आला. आपण तिचा खून केला आहे हे बालंट आता आपल्या अंगावर येणार हे ओळखून त्याने तिच्या खूनाचा बनाव करण्याचे ठरविले. त्याने तिच्या जवळ गॅसच्या शेगडीची तार ठेवून त्याचा शॉक बसून तिचा मृत्यू झाला आहे असा बनाव केला. आणि शनिवारी पहाटे लवकर उठून घराला बाहेरून कुलूप लावून तो निघून गेला. शनिवार दि.१६ जानेवारी रोजी संध्याकाळच्या दरम्यान त्याच्या घराशेजारी गल्लीतील काही मुले खेळत होती. त्यावेळी साळवी याच्या घराला बाहेरून कुलूप लावलेले एका मुलीला दिसले तिने घराच्या उघडया खिडकीतून आत बघितले तर खाटेवरती आशा साळवी या उताण्या अवस्थेत झोपलेल्या व त्याच्या तोंडातून रक्त येत असल्याचे तिला दिसले तिने ही घटना शेजाऱ्यांना सांगितली.

शेजाऱ्यांनी ही खिडकीतून आता बघितले तर आशा साळवी या त्याना मृतावस्थेत दिसल्या. त्यांनी या घटनेची माहिती लगेचच भोकरदन पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाला. त्यांनी घराचा दरवाजा तोडून आत जावून पाहिले असता त्यांना खाटेवरती आशा साळवी या मृतावस्थेत दिसल्या. त्याच्या डोक्यावर जोरदार वस्तूने प्रहार केल्याचे दिसून येत होते. त्याच्या नाका तोंडातून रक्त आल्याने त्याचा मृत्यू झाला होता. त्याचप्रमाणे मयताच्या शेजारी गॅस शेगडीची तार पडलेली होती. जेणे करून त्या गॅस शेगडीच्या तारेचा शॉक बसून तिचा मृत्यू झाल्याचा बनाव करण्यात आला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी जालना येथील जिल्हा रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांनी या घटनेची माहिती शेजाऱ्याकडून आणि मयताच्या नातेवाईकाकडून घेतली.ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची कल्पना पोलीसांना आली होती.

या घटनेतील संशयीत आरोपी रतन साळवी हा या घटनेनंतर फरार झाला होता. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो गावातील एका निर्जन स्थळी विष पिवून पडला असल्याचे पोलीसांना दिसून आले. पोलीसांनी त्याला लगेचच उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.तेथे त्याची परिस्थिती गंभीर होती.त्याचेवर उपचार सुरू होते. या घटनेची फिर्याद मयत आशा साळवी हिचा भाऊ राजू कडूबा पगारे रा.नळणी ब्रुदक भोकरदन याने पोलीसात दिली होती. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी आशा रतन साळवी(वय ३८) हिच्या खून प्रकरणी तिचा नवरा रतन सांडू साळवी (वय ४५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे भोकरदन पोलीसात गुन्हा दाखल केला होता.गंभीर अवस्थेत असलेल्या रतन साळवी याचा जबाब पोलीसांनी घेतला असता त्याने पोलीसांना सांगितले की त्याची पत्नी आशा साळवी ही त्याच्यावर व त्याच्या लहान भावाच्या बायकोवर विवाहबाहय संबंध असल्याचा संशय घेऊन भांडण काढत होती.त्या भांडणातूनच त्याने रागाच्या भरात तिच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोराचा प्रहार करून तिचा खून केला होता. व स्वत:ही विष प्राशन केल्याचे कबुल केले.घटना शब्द बध्द होईपर्यंत रतन साळवी याचेवर उपचार सुरू होते.या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी इंदरसिंग बहुरे, पो.निरी. चत्रभुज काकडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप.निरी. भागवत नागरगोजे पोलीस कर्मचारी रामेश्वर सिनकर, शेख असेफ यांनी केला.विवाह बाह्य संबंध हे टोकाला पोहचले की त्यातून अघटीत अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## थोडक्यात वृत्तांत

### वनशेती उपअभियान अंतर्गत अनुसुचीत जाती प्रवर्गामधील शेतकऱ्यानी प्रस्ताव सादर करावेत

लातूर : वातावरणातील बदलामुळे शेती क्षेत्रावर होणारे दुष्परीणाम कमी व्हावेत या साठी केंद्र शासनाने वनशेती विषयक धोरण २०१४ मध्ये लागु केले आहे शेतीपिकाना पुरक म्हणुन शेतावर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढवणे या उददेशाने ही योजना सुरु केलेली आहे. या योजनेमधुन शेतकऱ्याच्या शेतावर स्थानिक वणवृक्षाच्या लागवडीस प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते . सन २०२०-२१ मध्ये अनुसुचीत जाती प्रवर्गामधील ज्या शेतकऱ्यानी शेतावर वनवृक्षाच्या रोपाची लागवड केलेली आहे अथवा करण्यासाठी ईच्छुक आहेत अशा शेतकऱ्यानी संबधीत कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक , मंडळ कृषि अधिकारी अथवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे दि. २७ जानेवारी २०२१ पुर्वी संपर्क साधावा योजनेमधुन सलग शेतावरील लागवडीस प्रती हे रोपाच्या संख्येनुसार रु ३५०० ते २५००० या प्रमाणे अनुदान देय आहे सदरचे देय अनुदान हे चार वर्षामध्ये ४०:२०:२०:२० या प्रमाणात आहे. योजनेच्या अधिक माहितीसठी संबधीत तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क करावा.

### जवळगा येथील ग्रामस्थांची प्राथमिक आरोग्य केंद्राची जनता दरबारात मागणी

देवणी : देवणी तालुक्यातील जवळगा येथे लोकसंख्याच्या आधारावर प्राथमिक आरोग्य केंद्राची मंजुरी मिळावी या मागणीसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरज चव्हाण यांनी बुधवार दि.२० जानेवारी रोजी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांची भेट घेऊन जनता दरबारात आपल्या शिफारशीचा पत्र दाखल केला आहे. सदरील पत्रावर आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आरोग्य विभागास जवळगा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठीच्या तरतुदी करण्यासाठी सदरच्या पत्रावर शेरा दिला आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश कोषाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्याकडे जवळगा येथील देवणी काँग्रेस कमीटीचे तालुका उपाध्यक्ष तथा प्राचार्य रामलिंग मुळे व युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुरज मुळे यांनी जवळगा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळावी यासाठी निवेदनाद्वारे मागणी केली होती.

### पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते होणार मुख्य शासकीय ध्वजारोहण!

लातूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७१ व्या वर्धापन दिन समारंभानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते २६ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ९.१५ वाजता क्रिडा संकुलच्या मैदानावर होणार आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानी सकाळी ७.३० वाजता व जिल्हाधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत बार्शी रोड, येथे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या हस्ते सकाळी ८.०० वाजता होणार आहे. व जुने जिल्हाधिकारी कार्यालय शिवाजी चौक येथील ध्वजारोहन अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या हस्ते सकाळी ८.२० वाजता होणार आहे. या दिवशी सकाळी ८.३० ते १०.०० च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही अशासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये असेही यावेळी नमूद करण्यात आले. या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह होणार असून आमच्या अधिकृत Dio latur (https://www.facebook.com/dio.latur) या फेसबुक पेजवरुन सदर कार्यक्रमाचे लाईव्ह प्रेक्षेपण होणार आहे. या कार्यक्रमाची लिंक आमच्या या पेजवर शेअर केली जाईल. त्या लिंक वर जाऊन सदर कार्यक्रमाचे लाईव्ह प्रेक्षेपण पाहता येईल.

### लातूरमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

लातूर : समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर व सिध्दीविनायक प्रतिष्ठाण,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उमंग इन्स्टुट ऑफ ऑटीझम न्ड मल्टिडिसॅबीलीटी रिसर्च सेंटर आयोजित मोफत आरेग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरा मध्ये ऑटिझम (स्वमग्नता) बहुविकलांगता, मतिमंदता, बुदीअंकमापन, मुलातील अतिचंचलता,हात पाय वाकडे असणे, मुल अभ्यासत हुशार नसणे, मुलांचे लिहण्या-वाचण्यातील दोष, मुले उशीरा चालणे व बालणे, हात पाय कमजोर असणे इत्यादी आजारावर निदान व उपचार केले जाणार आहेत. सदरील शिबिर मंगळवार, दि.२६ जानेवारी २०२१ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे, शासकीय कॉलनी, बार्शी रोड, लातूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शाळेमध्ये शिकणारे जास्तीत-जास्त दिव्यांग विद्यार्थी शिबिरास उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर व सिध्दिविनायाक प्रतिष्ठाण, लातूर यांनी केले आहे.

### पतीच्या निधनानंतर दुसऱ्याच दिवशी पत्नीने ही घेतला जगाचा निरोप

देवणी : देवणी तालुक्यातील ममदापूर येथील प्रगतशील शेतकरी विठ्ठलराव माणिकराव पाटील वय ९५ वर्षे यांचे मंगळवार दि.१९ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. तर त्यांच्या पत्नी रूक्मीनबाई विठ्ठलराव पाटील वय ९० वर्षे यांचे बुधवार दि.२० जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास निधन झाले. पतीच्या निधनानंतर दुसऱ्याच दिवशी पत्नीचेही निधन झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त उपविभागीय अभियंता अण्णाराव विठ्ठलराव पाटील व शासकीय ठेकेदार वामनराव पाटील यांचे आई वडील होत. विठ्ठलराव पाटील यांचेवर अंतिम संस्कार बुधवारी चार वाजता ममदापूर येथे करण्यात आले. तर त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई पाटील यांचेवर गुरुवारी आकरा वाजता ममदापूर येथे अंतिम संस्कार करण्यात आले आहे त्यांच्या पश्चात पाच मुले तीन मुली सुना नातवंडे असा परिवार आहे.

क्राईम Reporter

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

9890718873

# सिरमची कोरोना लस सुरक्षित, लस उत्पादनाला फटका नाही -मुख्यमंत्री



**पुणे/प्रतिनिधी**

सिरमची कोरोना लस सुरक्षित आहे. कोव्हीशिल्ड लस उत्पादनाला कोणताही फटका बसलेला नाही. आग प्रकरणाची चौकशी सुरू असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर आगीचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. सिरम इन्स्टिट्यट्यूटला लागलेल्या आगीची पाहणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. दुर्घटनेबाबतची सविस्तर माहिती त्यांनी घेतली. तसेच सिरम इन्स्टिट्यट्यूटच्या टिमशी त्यांनी संवाद साधला. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे,कामगार मंत्री दिलीप वळसे-पाटील, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, खासदार गिरीश बापट, आमदार चेतन तुपे, सिरमचे अदर पुनावाला, विभागीय आयुक्त सौरभ राव, पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता, मुख्यमंत्री यांचे प्रमुख सल्लागार अजोय मेहता, आरोग्य सल्लागार डॉ.दीपक म्हैसेकर, पुणे महापालिका आयुक्त विक्रमकुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, संपूर्ण जगात कोविडचे संकट अद्यापही संपलेले नाही, गेल्या आठवड्यात सिरमच्या लसीमुळे आशेचा किरण निर्माण झाला आहे. लस बनविणाऱ्या केंद्रात आग लागली ही बातमी आली. दुदैवाने या दुर्घटनेत पाच कामगार मृत्यूमुखी पडले. लस बनवली जाते ते केंद्र साठा संपूर्णपणे सुरक्षित आहे. आगीचे वृत्त समजताच तातडीने संपर्क करून याबाबतची माहिती घेतली. ज्या ठिकाणी ही दुर्घटना घडली त्या इमारतीमधील पहिले दोन मजले वापरात आहेत, वरील दोन मजले जिथे नवे केंद्र सुरू केले जाणार होते, त्या ठिकाणी ही दुर्घटना घडली. मात्र कोविडची लस जिथे बनवली जाते, ते केंद्र अंतरावर आहे, सिरमची कोरोना लस सुरक्षित आहे. कोव्हीशिल्ड लस उत्पादनाला कोणताही फटका बसलेला नाही. आग प्रकरणाची चौकशी सुरू असून चौकशी पूर्ण होवून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आगीचे नेमके कारण स्पष्ट होईल. मृत्यू झालेल्या कुटुंबाची जबाबदारी सिरम कंपनीने घेतली आहे. त्याशिवाय काही आवश्यकता असेल तर शासन ती मदत निश्चित करेल, असे श्री.ठाकरे यांनी सांगितले. सिरमचे अदर पुनावाला म्हणाले, कोरोना लसीच्या पुरवठयावर कोणताही परिणाम नाही. बीसीजी आणि इतर लसीचे नुकसान झाले आहे. कोव्हिशिल्ड लसीचा पुरवठा सुरळीत असून लसीवर परिणाम नाही, मात्र आर्थिक नुकसान मोठे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## गोविंद गिरी यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान



**अहमदपूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना दशनाम युवक प्रतिष्ठान परभणीच्या वतीने समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यामध्ये अहमदपुर येथील सामाजिक तथा राजकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केलेले गोविंद भगवानराव गिरी यांना समाजभूषण पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सदरील कार्यक्रम परभणी शहरातील राजाराम सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या व्यासपीठावर परभणीचे आमदार मा.डॉ. राहुल पाटील यांच्या पत्नी डॉ.समंप्रिया राहुल पाटील,राम भारती (पिंपरखेडकर) डॉ.पी.एल.भारती, प्रसिध्द युवा उद्योजक धर्मवीर भारती (लातूर), हहभप अविनाश भारती. (घाटनांदुरकर) अनिल पुरी लातूर, हभप अमित महाराज पुरी अंबाजोगाई, शिवसंभा दादा गोसावी(पिंपरी चिंचवड). सुर्यकांत गिरी गोसावी (पुणे) हभप माऊली महाराज भारती (खडकवाडीकर)धनराज गिरी(उमरगा) राजु भारती(नांदेड). दादासाहेब गिरी. (गेवराई) आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रतिष्ठाणने काढलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले याच कार्यक्रमात वधू वर परीचय मेळावा घेण्यात आला. प्रास्तविक कार्यक्रमाचे संयोजक तथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्वप्नील भैया भारती यांनी केले, तर सुत्रसचंलन सुरेश पुरी व वैजनाथ गिरी यांनी केले, तर आभार प्रतिष्ठानचे सचिव शाम गिरी यांनी मानले.

## ठाणे जिल्हाधिकारी आदेशाने अवैध्यरित्या रेती उपसा व वाहतुकीविरूद्ध धडक कारवाई




**भिवंडी/अभिजित हिरे**

ठाणे अपर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांनुसार उपविभागीय अधिकारी डॉ मोहन नलदकर व तहसीलदार अधिक पाटील निवासी नायब तहसीलदार गोरख फडतरे भिवंडी, मंडळ अधिकारी खारबाव व मंडळ अधिकारी अप्पर भिवंडी, तलाठी कर्मचारी पोलीस उपायुक्त व सहकारी अधिकारी यांनी संयुक्तपणे काळ मध्यरात्री पासून ते आज सकाळी पर्यत काल्हेर कशेळी ते कोन पर्यतच्या खाडी पात्रामध्ये अवैध्यरित्या रेती उपसा व वाहतुकीविरूद्ध धडक कारवाई करण्यात आली.

सदरच्या कारवाईमध्ये ३ सक्शन पंप व ३ बार्ज खाजगी बोटीच्या साहाय्याने पकडले व खाडी किनारी आणून हायड्राद्वारे किनाऱ्यावर काढून गॅस कटरच्या साह्याने तुकडे करून नष्ट करण्यात आले. वरील मालमत्तेची अंदाजे किंमत ३० लाख रुपये आहे. तसेच अनधिकृत रेती वाहतूक करणारी एकूण ५ वाहने पकडण्यात आली असून त्यामध्ये सुमारे १० ब्रास एवढी अवैद्य रेती आढळून आली. सदर अवैद्य रेतीची किंमत अंदाजे रक्कम रूपये १० लाख एवढी होत आहे. सदरची वाहने जप्त करून दंडनीय कारवाईसाठी तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आली आहेत या कारवाईने कल्याण व भिवंडीतील रेती माफिया व अवैध वाहतूक करणार्याचे धाबे दणाणले आहेत.

## वाड्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस यांची आढावा बैठक संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

आगामी ग्रामपंचायत निवडणूकींच्या अनुषंगाने शुक्रवारी (दि.२२) राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस चेतन दळवी यांची बैठक संपन्न झाली. राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी पालघर जिल्हा यांच्या वतीने वाड्यातील राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची, वाडा शासकीय विश्राम गृह येथे बैठक संप्पन झाली, या वेळी चेतनजी दळवी प्रदेश सरचिटणीस युवक, रत्नागिरी युवक जिल्हा अध्यक्ष तथा पालघर जिल्हा निरीक्षक, वरून पारेख युवक जिल्हा अध्यक्ष, युवती जिल्हा अध्यक्ष हिंदवीताई, बांधकाम व अर्थ समिती पालघर अँड. काशिनाथ चौधरी जिल्हा परिषद, यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून कार्यकर्ता कसा निर्माण होतो आणि कार्यकर्ता स्वतः हून पक्षासाठी आपले अस्तित्व कसा निर्माण करतो ते कार्यकर्त्यांना पटवून दिले. युवक कार्यकर्त्यांच्या मनातील शंकांचे निरसन करून प्रोत्साहन देऊन आम्ही तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही देत काही संभ्रम न ठेवता पक्ष वाढीसाठी तुमी एकजूट होऊन पक्ष संघटना वाढवन्यासाठी युवा कार्यकर्त्यांना आवाहन केले. या प्रसंगी निखील पष्टे जिल्हा ऊपाध्यक्ष, विराज पाटील विक्रमगड विधानसभा अध्यक्ष, मिलींद सुतार युवक जिल्हा सरचिटणीस, राहुल वेखंडे युवक वाडा तालुकाध्यक्ष, सुरज माची डहाणू तालुका युवक अध्यक्ष, अमिन शेंदू वाडा शहराध्यक्ष, सुजित पाटील, अनिकेत पाटील, प्रमोद काठोले, महेश भोईर, मनिष निपूर्ते, अमोल रिकामे, उमेश दळवी, राजु वेखंडे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थीत होते.

## बस अपघातात जखमी झालेल्या सर्व रुग्णांना उपचारासाठी लागणार खर्च शासन करणार!

### आमदार देवेंद्र भुयार यांची परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासोबत चर्चा



**वरुड/प्रतिनिधी**

वरुड तालुक्यातील ढगा येथे १७ जानेवारी रोजी नागपुर वरुन वरुडकडे येत असलेल्या महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाची काटोल आगाराची बस क्रमांक एम.एच.४० एक्यु ६०५६ ढगा गावाजवळ सदावर्ती नदिच्या पुलावर विरुध्द दिशेने येणारा ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.२७ पु ११२५ ला जोरदार धडक लागल्यामुळे बस नदिपात्रामध्ये कोसळली. बसमधील २२ प्रवासी जखमी झाले. यावेळी आमदार देवेंद्र भुयार यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी झालेल्या प्रवाशांना तात्काळ उपचार करणेसाठी तातडीने ग्रामीण रुग्नालय, वरुड येथे हलविण्यात आले. त्यापैकी १२ प्रवाशाची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना वरुड येथुन जिल्हा सामन्य रुग्नालय, अमरावती येथे हलविण्यात आले आहे. जखमी असलेल्या सर्व प्रवाशांना शासनामार्फत उपचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता जखमींना शासनामार्फत उपचार करण्यासाठी अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याची मागणी आमदार देवेंद्र भुयार यांनी परिवहन मंत्री अनिलजी परब यांच्याकडे केली आहे. बस अपघातामध्ये जखमी झालेल्या रुग्णांना खाजगी किंवा शासकीय दवाखान्यात येणार खर्च परिवहन महामंडळ तर्फे करण्याचे निर्देश आमदार देवेन्द्र भुयार यांनी विभाग नियंत्रक यांना दिले आहे. यावेळी आमदार देवेंद्र भुयार यांनी एसटी अपघातातील जखमी कुसरे व नागदिवे परीवारांची भेट घेऊन एसटी अपघातामधील जखमीना खाजगी रुग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी आर्थिक मदत मिळवून देणार असल्याची माहीती मोर्शी- वरुड विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी दिली. आमदार देवेंद्र भुयार यांनी बस अपघातामध्ये जखमी झलेल्या प्रफुल मुंदाने सहूर, चंद्रशेखर टरके सहूर, हनिफ शहा शेघाट, अफसाना शहा शेघाट, मधुकर नागदेवे वरुड, कांता नागदेवे वरुड, निलेश नागदेवे वरुड, कैलास कुसरे वरुड, बस्तीराम युवनाते शेघाट, शिंधु युवनाते शेघाट, आनंद वाघमारे जरूड, रवींद्र सर्याम कुरळी, रामदयाल सिरसाम वरुड, ज्ञानेश्वर धर्माला चिंचरगव्हान, सुरज बरडे पारडी, अनवर शहा वरुड, कमलेश हरले वरुड, संजय पांडल वरुड, मीराबाई आगरकर लोणी, विजय वाघमारे, यांना तात्काळ आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याकरिता परिवहन मंत्र्यांकडे मागणी केली आहे.


## लॉज मधील दोन पीडित महिलांची सुटका

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात लॉजिंग च्या आड मोठ्या प्रमाणावर वेश्या व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी होत असताना ठाणे येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वळपाडा येथील रुचिरा लॉजिंग अँड बोर्डिग वर करावाई करीत दोन बळीत महिलांची सुटका करीत दोन जणांना ताब्यात घेतले आहे. वळपाडा येथे रुचिरा लॉजिंग अँड बोर्डिग असून त्या ठिकाणी व्यवस्थापक दिनेश वाघे व वेटर श्याम जानकी साव अशा दोघं जणांनी संगनमत करून लॉज वर दोन पीडित महिलांना वेश्याव्यवसाया साठी बोलावून लॉज मधील ग्राहकांनी मागणी केल्यास त्यांना महिला पुरवून त्यांच्या कडून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत वेश्याववसाय करण्यास माहिती ठाणे येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाच्या पथकाने कारवाई करीत दोन पीडित महिलांची सुटका करीत दोघीजणांना ताब्यात घेत त्यांच्या विरोधात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाच्या महिला पो कॉन्स्टेबल पूनम गुलाब खरात यांनी नारपोली पोलीस ठाण्यात व्यवस्थापक दिनेश वाघे व वेटर श्याम जानकी साव या दोघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सदर या गुन्ह्यात सुटका केलेल्या दोघा पीडित महिलांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली असून या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय क्षीरसागर हे करीत आहेत. गुन्हा दाखल केला आहे.

## भाजप नगरसेवक कामाठीसह ५ जण दोन वर्षांसाठी तडीपार स्वाक्षरीविनाच पोलिस आयुक्तालयातून बाहेर पडली ऑर्डर

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहरात अवैधरित्या मटका व्यवसाय चालविल्याप्रकरणी भाजपचे नगरसेवक सुनिल कामाठी (रा. न्यू पाच्छा पेठ), इस्माईल बाबू मुच्छाले (रा. मुस्लिम पाच्छा पेठ, जिंदाशा मदार चौक), शंकर चंद्रकांत धोत्रे (रा. भगवान नगर झोपडपट्टी), नवनाथ भिमशा मंगासले (रा. मुस्लिम पाच्छा पेठ), हुसेन सैपनसाब शेख (रा. मुस्लिम पाच्छा पेठ) हे मुंबई- कल्याण नावाचा अवैध मटका जुगार चालवत आहेत. त्यामुळे त्यांना दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश आज पोलिस आयुक्तालयाने काढले आहेत. शहरातील गुंड प्रवृत्तीचे लोक तथा गुन्हेगारांसह काही नगरसेवकांना यापूर्वी शहर पोलिस आयुक्तालयाने हद्दपार तथा तडीपार केले आहे. काहींवर एमपीडीएअंतर्गत कारवाईदेखील केली आहे. त्यावेळी आयुक्तालयाच्या प्रेसनोटमध्ये पोलिस आयुक्त, उपायुक्तांसह परिमंडळ अधिकाऱ्यांची नावे असायची. मात्र, भाजप नगरसेवक सुनिल कामाठीसह अन्य चौघांना अवैधरित्या मटका व्यवसाय केल्याप्रकरणी दोन वर्षासाठी सोलापूर, उस्मानाबाद जिल्हा आणि पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातून तडीपार करण्याचे आदेश आयुक्तालयाने आज काढले. या ऑर्डवर कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसून कारवाई केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावेदेखील नसल्याचे दिसून येते. अवैधरित्या मटका व्यवसायप्रकरणी पोलिसांनी शंभरहून अधिकजणांविरुध्द कारवाई केली आहे. त्यातील कामाठी, मुच्छाले, धोत्रे, मंगासले, शेख या पाचजणांना सोलापूर, उस्मानाबाद जिल्हा आणि पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातून तडीपार करण्यात आले आहे. दोन वर्षासाठी हे आदेश असल्याचेही पोलिस आयुक्तालयाने त्यांच्या आदेशातून स्पष्ट केले आहे. पोलिस उपायुक्त परिमंडळ कार्यालयातील वाचक अधिकारी तथा पोलिस उपनिरीक्षक एन. एस. कानडे यांनी आदेश काढले. मात्र, त्यावर ना त्यांची ना कोणत्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी आहे.

# ...अन्यथा शेतकरी नक्षलवादी बनेल!

नव्या कृषी कायद्याच्या विरोधात शेतकऱ्यांचे जे आंदोलन सुरू आहे, त्या आंदोलनात स्त्रिया, मुलेही सामील आहेत. ज्या ठिकाणी त्यांचे आंदोलन सुरू आहे तिथं कडाक्याची थंडी आहे. मात्र त्याही स्थितीत शेतकरी कुटुंबाचा सरकारच्या विरोधात लढण्याचा निर्धार कायम आहे. त्यामुळे या शेतकरी बंधू-भगीनींना कौतुक करावे तेवढे थोडेच! आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची एकच मागणी आहे की एमएसपीबाबत कायदा करावा आणि संसदेत जी तीन बिले पास करून कृषी कायदा करण्यात आलंय तो रद्द करावा. पण सरकार त्याला तयार नाही. सरकार आणि आंदोलनकर्ते शेतकरी यांच्यात आजवर ११ बैठका झाल्या, पण त्या सगळ्या निष्फळ ठरल्या. या आंदोलनात जर सगळ्यात वाईट काय घडले असेल तर इलेक्ट्रॉनिक मिडियाकडून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना बदनाम करण्याचा करण्याचा जो प्रयत्न सुरू आहे तो लोकशाहीच्या चौथ्यास्तंभाच्या विश्वासार्हतेला डांबर फासणारा आहे. शेतकरी खलिस्तानवादी आहेत, माओवादी आहेत, ते विरोधी पक्षाच्या तालावर नाचतात, असे बेछूट आरोप इलेक्ट्रॉनिक मीडिया कडून केले जात आहे. बळीराजा हा अन्नदाता आहे. त्याला दहशतवादी ठरवण्याचे पाप मीडियाकडून का केले जाते तेच कळत नाही. ठीक आहे त्यांनी सरकारची चापलुसी जरूर करावी, पण संविधनाने दिलेला अधिकार वापरून जर कुणी शांततेने आंदोलन करीत असेल, तर त्यांना मीडियाने बदनाम करू नये. या आंदोलनातील तिढा लवकरात लवकर सुटायला हवा. यासाठी मीडियाने सरकार आणि आंदोलक दोघांचीही भूमिका देशासमोर प्रामाणिकपणे ठेवायला हवी. शेतकरी आपल्या हक्कासाठी लढत आहेत ही बाब सर्वोच्च न्यायालयानेही मान्य केली आहे. मग इलेक्ट्रॉनिक मीडियाच शेतकऱ्यांना दोषी का ठरवीत आहे. मुळात सरकारने मागील अधिवेशनात जेंव्हा ही तीन कृषी विधेयके मांडली, तेंव्हा त्यावर पुरेशी चर्चाच झाली नव्हती. या देशात शेतकऱ्यांची संख्या ६५ कोटी पेक्षा अधिक आहे. शिवाय हा देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो असे असताना ६५ कोटी लोकांच्या व्यवसायाशी संबंधित असलेला निर्णय एकतर्फी घेतला जाऊ शकत नाही. ही तीन विधेयके संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून घेण्यापूर्वी सरकारने शेतकरी संघटनांशी चर्चा करायला हवी होती. पण तसे न करता संसदेत ही विधेयके परस्पर मांडून बहुमताच्या जोरावर ती मंजूर करून घेण्यात आली आणि याच गोष्टीचा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना राग आहे. म्हणूनच ते मागे हटायला तयार नाहीत. सरकारकडून हे आंदोलन मोडून काढण्यचे सर्व प्रयत्न झाले, पण त्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे शेवटी त्यांनी नव्या कृषी कायद्याला दीड वर्ष स्थगिती देण्याचा प्रस्ताव सरकारने दिला आहे. पण तोही शेतकऱ्यांना मान्य नाही. हा काळा कायदा रद्द करा त्याशिवाय माघार नाही या भूमिकेवर शेतकरी ठाम आहेत. तर हा कायदा आता मोदींच्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनलेला असल्याने सरकार माघार घ्यायला तयार नाही. पण सरकार जर दीड वर्ष या कायद्याला स्थगिती द्यायला तयार असेल तर हा कायदा रद्द करण्यात काय अडचण आहे. शेवटी शेतकऱ्यांचे हित कशात आहे ते शेतकऱ्यांना जास्त ठाऊक आहे की सरकारला? याचा तरी सरकारने विचार करावा. कोणतीही आंदोलने ही अधिक ताणायची नसतात. कारण तसे केले तर त्यात आंदोलन करते आणि सरकार दोघांचेही नुकसान असते. १९८२ साली मुंबईत जो गिरणी कामगारांचा बेमुदत संप झाला तो अशाच दोन्हीकडच्या हटवादी भूमिकेमुळे अयशस्वी झाला आणि या संपाने मुंबईतल्या गिरणी कामगार वर्गाला आणि देशातील कापड व्यवसायाला बरबाद केले. अशी उदाहरणे डोळ्यासमोर असताना सरकार आणि आंदोलनकर्ते यांची हटवादी भूमिका कशासाठी? शेतकरी आपला कामधंदा सोडून दिल्ली, हरयाणाच्या सीमेवर बायकापोरांना घेऊन बसलेत. तर दुसरीकडे या आंदोलन बाबत नेमकी काय भूमिका घ्यायची यावर विचार करण्यात सरकारचा वेळ जातोय. त्यामुळे नुकसान दोघांचेही आहे. देशाला गहू आणि इतर धान्याचा सर्वाधिक पुरवठा पंजाब आणि हरयाणा या दोन राज्यातून होतो. पण गेल्या तीन महिन्यांपासून या दोन्ही राज्यातले शेतकरी काम धंदा सोडून आंदोलनाला बसलेत. अशावेळी या वर्षी धान्याच्या उत्पादनात घट होईल आणि त्याचे दुष्परिणाम देशातील जनतेला अन्नधान्याची टंचाई आणि महागाईचा रूपाने भोगावे लागतील. त्यामुळे हा तिढा सुटायलाच हवा. सरकार आणि आंदोलनकर्ते यांनी सामंज्यास्याची भूमिका घ्यायला हवी. चर्चेतून जर हा प्रश्न सुटणार नसेल तर परिस्थिती आणखी गंभीर बनेल. शेतकऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी ट्रॅक्टर रॅली काढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल आणि देशातील वातावरण आणखी बिघडेल. आज शांततेने आंदोलन करणारे शेतकरी उद्या हिंसक होऊन तोडफोड करणार नाहीत याची काय ग्यारंटी? शेवटी माणसाच्या संयम राखण्याचा काही मर्यादा आहेत. कारण जसजसे दिवस वादात आहेत तसतसा शेतकऱ्यांच्या मनात सरकार विरूद्ध संताप वाढतोय. त्याचे कधी जनप्रक्षोभात रूपांतर होईल हे सांगता येत नाही, म्हणूनच सरकारने आता निर्णायक भूमिका घेऊन हा तिढा सोडवायला हवा. कारण शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला संपूर्ण देशातील शेतकऱ्यांचा पाठींबा आहे. कारण एमएसपीसारखे मुद्दे सर्वच शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहेत. त्यामुळे केवळ या आंदोलनात पंजाब हरयाणा मधीलच शेतकरी सामील आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. केंद्राची दलाली करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मिडीयाला नेमकी हीच वस्तुस्थिती दिसत नाही. त्यामुळे काही चॅनलवाले कृषी कायद्याबाबत देशातील शेतकऱ्यांमध्ये मतभेद असल्याचे चित्र निर्माण करीत आहेत. पण प्रत्यक्षात तसे नाही. देशातील सर्व शेतकरी कृषी कायद्याच्या विरोधात एकजुटीने उभा आहे. त्यामुळेच पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारची डोकेदुखी वाढलेली आहे. आणि आता तर ती आणखीनच वाढणार आहे. कारण शेतकऱ्यांची समजूत घालण्यात केंद्राला पूर्णपणे अपयश आले आहे. अशा स्थितीत केंद्र सरकार जबरदस्तीने कृषी कायदा शेतकऱ्यांवर लादू शकत नाही. केंद्राच्या हातचे बाहुले बनलेल्या इलेक्ट्रॉनिक मीडियाने किती जरी थयथयाट केला किती जरी अफवा पसरवल्या तरी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर त्याचा जराही परिणाम होणार नाही. कारण गेल्या अडिज महिन्यांपासून कडाक्याच्या थंडीत मुलाबलांसह आंदोलनाला बसलेला शेतकरी आता कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही. त्यामुळे केंद्र सरकारला कृषी कायदा मागे घ्यावाच लागेल.

# मराठा आरक्षणाचा तीढा!




मराठा आरक्षणाचा मुद्दा योग्य आहे की अयोग्य हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. कारण काही लोकांच्या मते मराठा समाज हा शिवाजी महाराजांच्या काळा पासून सत्तेत किंवा सत्तेच्या जवळपास असल्याने वेगवेगळ्या प्रकारचे अधिकारच त्यांच्या हाती होते. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती चांगली नाही असे म्हणणे बरोबर नाही. पण हे अर्ध सत्य आहे. कारण मराठा समाजात मोठ्या संख्येने गरीब, भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकरी सुद्धा आहेत आणि त्यामुळेच त्यांना शिक्षणात तसेच नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची गरज आहे. अर्थात या दोन्ही बाजूमध्ये तथ्य आहे. पण मागील आघाडी सरकारने मराठा समाजाला जे १६ टक्के आरक्षण दिले ते केवळ मता कडे लक्ष ठेऊन हे सुद्धा तितकेच खरे आहे. कारण स्वातंत्र्य प्राप्तीच्या गेल्या ७० वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील सत्ता मराठ्यांच्याच हातात होती. मग त्यावेळी सत्ताधारी मराठा नेत्यांनी मराठा समाजातील गरीब वर्गाचा का विचार केला नाही? आणि आता आरक्षणासाठी मराठा समाजाला न्यायालयाच्या दारात ताटकळत उभे केले आहे. सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले. त्यासाठी विधिमंडळात ते मंजूर करून घेतले, पण ते न्यायालयात कसे टिकेल याचा विचार त्यावेळच्या आघाडी सरकारने केला नाही. फडणवीसांच्या काळात मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून मराठा आरक्षणाला अमली जामा घालण्याचा जरूर प्रयत्न झाला आणि मुंबई उच्च न्यायालयाने ते मंजूर सुद्धा केले. मात्र त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने आता तिथे हे प्रकरण खोळंबले आहे. सुरवातीला तीन न्यायधिषांच्या खंडपीठाकडे सुनावणीसाठी असलेले हे प्रकरण आरक्षण समर्थक आणि सरकारच्या विनंतीवरून ५ न्यायाधिशांच्या घटनापिठासमोर आहे. वास्तविक २० तारखेला या प्रकरणावर सुनावणी व्हायला हवी होती. पण सरकारने वेळ मागून घेतल्याने आता पुढील ५ फेब्रुवारी रोजी सुनावणी होईल. मराठा आरक्षणाचे हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात की सर्वोच्च न्यायालय असो तारीख पे तारीखमध्ये अडकलेले आहे. त्यामुळे याचे काय भवितव्य असेल हे परमेश्वराला ठाऊक. पण या तारीख पे तारीख मुळे मराठा समाज मात्र अस्वस्थ आहे. कारण प्रकरण न्यायालयात असल्याने कनिष्ठ महा विद्यालयातील प्रवेश आणि नोकर भरतीत १६ टक्के आरक्षण यासाठीचे जे लाभार्थी आहेत त्यांची कोंडी झाली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचे समर्थक नेहमीप्रमाणे सरकारला दोष देत आहेत. सरकार कमी पडतेय, मुद्दाम चाल ढकल करतेय असा त्यांचा आरोप आहे. त्यावरून ते आता पुन्हा सरकारच्या विरोधात मोठ्या आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. परिणामी आरक्षणाचा हा मुद्दा दिवसेंदिवस स्फोटक बनतोय. त्यातून निर्माण झालेली सामाजिक दरी अधिकच रुंदावत आहे. खास करून मराठा समाजातील काही लोक मराठ्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी करायला लागल्यापासून ओबीसी समाजही खवळला आहे आणि रस्त्यावर उतरण्याची भाषा करीत आहे. तसे झाले तर महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अधिकच गंभीर बनेल. खास करून राज्य मंत्रिमंडळात यावरून मतभेद आहेत. एका मंत्र्याने तर ओबीसीसाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे हे प्रकरण आता अधिकच गंभीर बनले. जे लोक आरक्षणाला राजकारणाचा मुद्दा बनवण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना किमान हे कळायला हवे होते की घटनेत आरक्षणाची तरतूद बाबासाहेबांनी का आणि कोणासाठी केली होती? आरक्षण हा काही सत्यनारायणाच्या पुजेचा प्रसाद नाही की तो प्रत्येकच्या हातावर पडायलाच हवा. आरक्षण ही वर्णव्यवस्थेमुळे भरडल्या गेलेल्या एका मोठ्या समाजाला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेली एक तरतूद होती. त्यामुळे घटनेत आरक्षणाची जी ५० टक्क्यांची मर्यादा आहे तीच कायम असायला हवी. पण आरक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांनी जातीपातीच्या नावाने आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच चूड लावलीय. त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडला आहे. आता यातून जातीय दंगली उसळल्या तर त्याला जबाबदार कोण? सर्वोच्च न्यायालयात सुद्धा जरी हे प्रकरण घटनापीठाकडे असले तरी त्यावर लवकर निकाल येईल असे वाटत नाही. कारण हा विषय इतका किचकट बनलेला आहे की घटनापीठ सुद्धा त्यावर काही करू शकत नाही आणि हे वास्तव ठाऊक असतानाही मराठा आरक्षणाचे समर्थक आकडं तांडव करीत रस्त्यावर उतरण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा स्थितीत सरकारने तरी काय करणार? कारण जेंव्हा एखादे प्रकरण न्यायप्रविष्ठ असते तेंव्हा त्यावर सरकारलाही काही करता येत नाही आणि महाराष्ट्र सरकारची हीच मजबुरी आरक्षण समर्थक समजून घ्यायला तयार नाही. जर सरकारने आरक्षण दिलेले आहे, तर सरकार आपल्याच निर्णयात टांग अडविण्याचा का प्रयत्न करील आणि म्हणूनच आता मराठा समाजानेही सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रतिक्षा करावी त्यातच त्यांचे आणि महाराष्ट्रातील जनतेने हित आहे.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# प्रजासत्ताक दिनासाठी महाराष्ट्राचा 'वारकरी संतपरंपरा' चित्ररथ सज्ज



महाराष्ट्राच्यावतीने 'वारकरी संतपरंपरे'वर आधारित चित्ररथ यावर्षी प्रजासत्ताकदिनी होणाऱ्या राजपथावरील पथसंचलनासाठी सज्ज झाला आहे. चित्ररथासोबत सहभागी होणाऱ्या कलाकारांमध्ये प्रचंड उत्साह बघायला मिळत असून चित्ररथाची बांधणीही पूर्ण झाली आहे. महाराष्ट्रासह १७ राज्यांचे आणि १५ केंद्रीय मंत्रालयांचे असे एकूण ३२ चित्ररथ राजपथावरील पथसंचलनात सहभागी होणार असल्याचे संरक्षण मंत्रालयाचे जनसंपर्क अधिकारी नम्पीबौ मरिनमई यांनी कॅंटॉन्मेंट परिसरातील राष्ट्रीय रंगशाळा येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. प्रजासत्ताकदिनी दरवर्षी राजपथावर राष्ट्रपती, पंतप्रधान आणि परदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात विविध राज्यांची संस्कृती व वैशिष्टे दर्शविणारे दर्जेदार चित्ररथ प्रदर्शित करण्याची परंपरा आहे.महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने चित्ररथाच्या संकल्पनेपासून ते चित्ररथ बांधणी व कलाकारांच्या सरावासह प्रत्यक्ष चित्ररथ संचलनाचे कार्य पार पडते. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, राज्यमंत्री डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर आणि विभागाचे सचिव सौरभ विजय यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या वारकरी संतांची थोर परंपरा दर्शविणारा चित्ररथ सादर करण्याचा निर्णय झाला आणि विभागाने ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत सुंदर व सुबक चित्ररथ तयार केल्याचे सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी परिचय केंद्राशी बोलताना सांगितले. वारकरी संत व समकालीन संतांनी जाती व्यवस्था, विषमता आणि अंधश्रध्देविरोधात आवाज उठवत समाजप्रबोधनाचे महान कार्य केले आहे. हीच संतपरंपरा दर्शविणाऱ्या महाराष्ट्राच्या चित्ररथावर वारकरी संप्रदायाचा पाया रचणा-या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची ८ फुट उंचीची आसनस्थ मुर्ती खास आकर्षण आहे. संत ज्ञानेश्वरांच्या मुर्तीसमोर ज्ञानेश्वरी ग्रंथ' दर्शविण्यात आला आहे. चित्ररथाच्या मध्यभागी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि वारकरी संप्रदायाच्या इमारतीचे कळस झालेले संत तुकाराम महाराज यांच्या भेटीवर आधारीत भक्ती आणि शक्ती'चा संदेश देणारे प्रत्येकी ८ फुट उंचीचे फिरते पुतळे आहेत. या पाठोपाठ राज्यातील वारकरी संतांचे व भक्तांचे दैवत असणाऱ्या पांडुरंगाची कटेवर हात असणारी या चित्ररथावरील ८.५ फुट उंचीची लोभस मुर्ती भक्तीभावाच मुर्तीमंत रुप घेवून अवतरली आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात ८ फुट उंचीचा संतवाणी' हा ग्रंथ उभारण्यात आला आहे व यावर संतांची वचने लिहिण्यात आली आहेत. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत नामदेव, संत शेख महंमद, संत नरहरी, संत सावता, संत दामाजीपंत, संत गोरोबा, संत एकनाथ, संत सेना, संत चोखामेळा यांच्या मुर्ती उभारण्यात आल्या आहेत. राज्याच्या चित्ररथाचे संकल्पनाचित्र तसेच, त्रिमिती प्रतिकृती नागपूर येथील टीम शुभचे रोशन इंगोले (केळझर, वर्धा) आणि तुषार प्रधान (यवतमाळ) या कलाकारांनी तयार केले आहेत. कला दिग्दर्शक नरेश चरडे आणि पंकज इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ३० कारागीरांनी अतिशय आकर्षक चित्ररथ उभारला आहे. या चित्ररथावर एकूण चार फिरत्या मुर्ती साकारण्यात आल्या असून त्यासाठी यवतमाळ येथील राजेश टेंभरे आणि अंकुश टेंभरे या पिता-पुत्रांनी तंत्रज्ञ म्हणून चोख भूमिका वठवली आहे. टाकावू वस्तुंचा वापर करून या पिता-पुत्रांनी चित्ररथावरील शिवाजी महाराज व तुकाराम महाराजांच्या भेटीची मुर्ती, पांडुरंगाची कटेवर हात असलेली मुर्ती, संत जनाबाई आणि संत चोखामेळा यांच्या फिरत्या मुर्ती उत्तमरित्या कार्यन्वीत केल्या आहेत. वारकऱ्यांच्या वेशात मृदंग, टाळ आणि विणाधारी चार कलाकार चित्ररथावर प्रस्तुती देणार आहेत. याशिवाय चित्ररथाच्या उजव्या व डाव्या बाजुला प्रत्येकी चार कलाकार वारकऱ्यांच्या भूमिका साकारणार आहेत. ठाणे येथील कलांकुर गृपचे १२ कलाकार या भूमिका साकारणार आहेत. राजपथावरील प्रमुख पाहुण्यांसमोर चित्ररथ येताच येथे होणाऱ्या सादरीकरणात 'विठुचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला' हे विठ्ठलाचा महिमा सांगणारे गीत ऐकायला मिळणार आहे. यासोबत ज्ञानोबा माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम, विठ्ठल विठ्ठल, जय जय रामकृष्ण हरी, पांडुरंग-पांडुरंग' हे वारकरी संप्रदायातील प्रसिध्द नामघोष ऐकविण्यात येणार आहेत.

# नागरिकांनी प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरु नयेत!

राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजामुळे राष्ट्रध्वजाचा आवमान होतो. याकरीता प्लास्टिकचा राष्ट्रध्वज वापरण्यास प्रतिबंध असल्याचे परिपत्रक गृह विभागाने जारी केले आहे. दरवर्षी २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांच्यावेळी विद्यार्थी व नागरिकांकडून कागदाच्या व प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. अशा कार्यक्रमात प्लास्टिकचे ध्वज वापरल्याने, कार्यक्रमानंतर कागदी व प्लास्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडल्याने राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा उचीत सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. ध्वज संहितेच्या कलम २.२ मधील प्रयोजनासाठीच कागदी राष्ट्रध्वज वापरता येतो. प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत ध्वजसंहितेमध्ये काहीही नमूद नाही. याचा विचार करता ध्वजसंहितेच्या तरतुदींचे पालन करावे. तसेच कोणीही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करु नये. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतुदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. जिल्हाधिकारी यांनी प्लास्टिक व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृती करण्याकरीता जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्याच्या सूचना आहेत. या समित्या पुढील प्रमाणे राहणार असून यात जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून, पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर, आयुक्त, महानगरपालीका, लातूर, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर, जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर, शिक्षणाधिकारी, माध्यमिक,प्राथमिक, नेहरु युवा केंद्र, लातूर हे समितीची सदस्य असतील तर समितीचे सदस्य सचिव उपजिल्हाधिकारी सामान्य हे असणार आहेत. तर तालूकास्तरीय समितीचे अध्यक्ष तहसीलदार हे असून, पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपरिषद, गट शिक्षण अधिकारी, तालुका क्रीडा अधिकारी, अशासकीय सेवाभावी संस्था, संघटना हे समितीचे सदस्य असतील तर नायब तहसीलदार, महसूल हे सदस्य सचिव म्हणुन समितीचे कामकाज पाहतील. कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तालुका व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपूर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटनाना देण्यात आले आहे. त्यांनी असे खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्याकडे सुपुर्द करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनानी तसेच नागरिकांनी सुपूर्द केलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावे. अशाप्रकारे बांधलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक नष्ट करण्याबाबत परिपत्रकात व ध्वजसंहितेत स्पष्ट सूचना आहेत. त्यानुसार खराब झालेल्या राष्ट्रध्वजाची विल्हेवाट लावण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर केलेल्या उपरोक्त व्यवस्थेबाबत सर्व शासकीय कार्यालये, अर्धशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणे व शैक्षणिक संस्था यांनी योग्य ती दखल घ्यावी व कार्यवाही करावी, तसेच नागरिकांनी प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरु नयेत असे गृह विभागाच्या परिपत्रकात आदेशित करण्यात आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# दोन कोटींच्या बेडशिटऐवजी विदेशात पाठवली दगडी

## हेराफेरी करणाऱ्या चौकडीला पोलिसांनी केले जेरबंद



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीतून विदेशात जाणाऱ्या सुमारे २ कोटी रुपयांच्यावर बेडशीट चोरीचा नारपोली पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे कंटेनरच्या साह्याने भिवंडीतून न्हावाशेवा पोर्ट बंदरपर्यंत सीलबंद असलेल्या बेडशीटचे बॉक्स जलवाहतूक मार्गाने विदेशात पाठिण्यात येत होते. मात्र भिवंडी ते न्हावाशेवा पोर्ट दरम्यानच चोरटे कंटेनरमधून बेडशीटचे बॉक्सकाढून त्याबॉक्स मध्ये तेवढ्याच वजानेचे दगडी भरून विदेशात पाठवीत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी चार आरोपींना नारपोली पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या पैकी १ कोटी ९२ लाखांहून अधिक बेडशिटचे बॉक्स हस्तगत करण्यात आल्याची माहिती भिवंडीचे पोलीस उपाआयुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे. सर्फराज मोहम्मद युनूस अन्सारी, (वय ४५, रा.गोवंडी प.मुंबई) मोहम्मद फारूक मोहम्मद यासीन कुरेशी, (वय ४६ रा.गोवंडी प. मुंबई) मोहम्मद रिहान मोहम्मद नबी कुरेशी, (वय २९, रा.मुरादाबाद, उत्तरप्रदेश. मोहम्मद मुल्तजीम मोहम्मद हजिम कुरेशी, (वय ३०, मुरादाबाद, उत्तरप्रदेश) असे अटक केलेल्या आरोपींचे नावे असून चौघेही उत्तरप्रदेशचे रहिवासी असून ते गुन्हा करून मूळगावी पळून गेले होते. मात्र पोलिसांना आरोपींचे मोबाईल लोकेशन व वाहनांतील जीपीएस सिस्टमच्या मदतीने आरोपीपर्यत पोहचण्यास मदत झाली आहे.

यंत्रमाग नगरी म्हणून भिवंडी शहराची ओळख असून येथून कपडा उद्योगात तयार होणाऱ्या विविध कपड्यांना विदेशात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. अश्याच एका विदेशी कंपनीने भिवंडीतील काल्हेर भागात असलेल्या भरत श्याम मेहरोत्रा, व सचिन सज्जन झुनझुनवाला या दोन यंत्रमाग कंपनीच्या मालकांना २ कोटी रुपयांच्यावर विदेशातील एका कंपनीने बेडशीटची ऑर्डर दिली होती. त्याप्रमाणे यंत्रमाग मालकाने बेडशीट तयार करून पॅकिंग करीत ट्रेलरद्वारे सिलबंद कंटेनरमध्ये ते न्हावाशेवा पोर्ट बंदर येथे पाठवीत होते. त्यामध्ये १ कोटी २६ लाख ९९ हजार ,८०९ रुपयांच्या बेडशीट बॉक्स २० ऑक्टोंबर २०२० रोजी सिलबंद कंटेनरमध्ये तर अश्याच पद्धतीने १० नोव्हेंबर २०२० रोजी १ कोटी १५,लाख रुपयांच्या बेडशीटचे बॉक्स भिवंडीहुन न्हावाशेवा पोर्टला रवाना केले होते. विशेष म्हणजे सदरच्या बेडशीटचे बॉक्स विदेशात आठ दिवसानंतर ऑर्डर देणाऱ्या कंपनीत पोहचले त्यावेळी बॉक्समध्ये बेडशीट ऐवजी दगडी भरलेले आढळून आले होते. त्यामुळे तेथील कंपन्यांच्या मालकाने भिवंडीतील बेडशीट तयार करणाऱ्या कंपनीच्या दोन्ही मालकांना हि गंभीर बाब निदर्शनास आणून दिली होती. त्यांनतर दोन्ही मालकांनी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी चोरट्याचा तपास सुरु केला होता. दोन्ही कंटेनर चालक व त्यांचे इतर दोन आरोपी असलेले हे एकमेकांचे नातेवाईक असून सर्वच उत्तरप्रदेशमधील आसपासच्या गावात राहणारे आहे. गुन्हा आपला उघडकीस येईल या भीतीने त्यांनी बेडशीटचे बॉक्स वसई मध्ये तर काही मूळगावी गोदामात लपून ठेवले होते.

मात्र पोलिसांनी शिताफीने तपास करून या चारही आरोपीना अटक केली आहे. विशेष म्हणजे जगभरात सुरु असलेल्या कोरोना आजारामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामात परदेशात माल निर्यात करणारे भारतीय व्यापाऱ्यांची मलीन झालेली प्रतिमा उंचावुन सदर दोन्ही गुन्हे उघडकीस आणुन एकुण १ कोटी ९२ लाख ,८७० रुपयांचा बेडशिटचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सद्या आरोपी पोलीस कोठडीत असुन त्यांनी अशा प्रकारचे इतर गुन्हे केले असल्याची माहिती मिळत असुन त्यांचेकडून इतर गुन्हे देखील उघड होण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे.

# रिक्षात विसरलेली दागिने आणि कपड्याची बॅग घेऊन पळालेल्या रिक्षाचालकास शिताफीने अटक

**भाईंदर/प्रतिनिधी**

रिक्षा किंवा टॅक्सी सारख्या सार्वजनिक वाहनांमध्ये जर एखादा प्रवासी त्याचे समान विसरला असेल तर ते समान त्या प्रवाशाला परत करणे संबंधित वाहन चालकाची जबाबदारी असते. पण सगळेच काही प्रामाणिक नसतात. जे प्रामाणिक असतात ते प्रवाशांच्या विसरलेल्या वस्तू स्वतःहून परत करतात किंवा पोलीस ठाण्यात आणून देतात. पण जे प्रामाणिक नसतात ते त्या वस्तू घेऊन पळून जातात. त्यामुळे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा शोध घेवून त्यांनी पळवलेले प्रवाशांचे समान त्या प्रवाशाला मिळवून देण्याचे अवघड काम पोलिसांना करावे लागते. नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी आपल्या पोलीस पथकाच्या मदतीने अशीच एक अवघड कामगिरी पार पडली आहे.

भाईंदर पुर्वेच्या नवघर रोडवरील कस्तुरी पार्कमध्ये राहणाऱ्या तुकाराम परशुराम कदम यांच्या मुलीचे ११/१२/२०२० रोजी भाईंदरच्या इंद्रवरूण सभागृहात लग्न होते. या लग्नासाठी त्यांची पत्नी कपडे व दागिन्यांची एक बॅग घेऊन रिक्षाने निघाली होती. मात्र लग्न समारंभ स्थळी रिक्षातून उतरताना ती बॅग रिक्षातच विसरल्या, लक्षात येईपर्यंत रिक्षा गेली होती. मात्र रिक्षात बॅग विसरल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या पतीला याची माहिती कळवली. त्यानंतर तुकाराम कदम यांनी तत्काळ नवघर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. सदर फिर्यादीवरून सपोनि काळे पो.न.१४१८ भालेराव व पथकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच तांत्रिक तपासाद्वारे रिक्षाचा नंबर प्राप्त केला. रिक्षाचा नंबर होता एमएच ०४ जे क्यू ६८९६ हा नंबर मिळताच काशिमिरा येथे जाऊन रिक्षा मालकाची भेट घेतली. मात्र त्याने हि रिक्षा काशिमिरा येथे राहणाऱ्या मोहम्मद मुस्तफा मक्सुदअल्ली याला भाड्याने चालवण्यास दिल्याचे सांगितले. त्यानंतर रिक्षा चालक मोहम्मद मक्सुदअलीचा शोध घेणे सुरु झाले. सदर रिक्षा चालक हा त्याच्या मुळगावी उत्तर प्रदेश येथे जाऊन ११/१/२०२१ रोजी काशिमिरा येथे परत आल्याचे समजले. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन त्याच्या रिक्षात विसरलेल्या बॅगेबाबत चौकशी केली असता त्याने फिर्यादीच्या पत्नीचे कपडे ५३.५७ गरम वजनाचे दागिने ज्याची किमत २,५०००० असलेली बॅग मुळगावी नेऊन ठेवल्याचे सांगितले. त्यामुळे रिक्षा चालकाच्या विरुद्ध गु.र. क्रमांक ०१७९/२०२१ कलम ४०३ अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल करून दागिने व कपडे असलेली बॅग उत्तर प्रदेशात जाऊन पोलिसांनी जप्त केली. सदरची कामगिरी परिमंडळ १ चे पोलीस उपयुक्त अमित काळे नवघर विभागाचे सहा.पोलीस आयुक्त डॉ.शशिकांत भोसले व नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली. पो.नि. संपतराव पाटील यांनी यापूर्वी तुळींज, वसई माणिकपूर तसेच वाहतूक शाखा येथे काम करताना अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा लावलेला आहे आणि या गुन्ह्यातही त्यांनी अत्यंत कौशल्याने आपल्या पथकाच्या मार्फत गुन्ह्याचा छडा लावला. या बाबत फिर्यादिनी संपतराव पाटील आणि त्यांच्या पोलीस पथकाचे आभार मानले आहेत.

# सोलापूर जिल्ह्यात वाहतूक सुरक्षा सप्ताहात वाहन चालकांना प्रबोधन




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यात सोलापूर ग्रामीण पोलीस, जिल्हा वाहतूक शाखा आणि जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात वाहतूक जनजागरण सप्ताह राबविण्यात येत आहे. याअंतर्गत वाहन चालकांमध्ये वाहतूक नियमांचे प्रबोधन करण्यात येत आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट, करमाळा, पंढरपूर आणि वैराग येथील स्थानिक पोलीस ठाण्याच्या विद्यमाने वाहतूक सप्ताह साजरा करताना वाहन चालकांना वाहतूक नियमांची जाणीव करून देण्यात आली. मद्य प्राशन करून वाहने चालवू नका, हेल्मेट वापर नियमित करा, सीट बेल्टचा वापर करावा, चुकीच्या दिशेने वाहन चालवू नका, वाहन चालवताना परवानाशिवाय वाहने चालवू नका आणि वेगमर्यादेवर नियंत्रण ठेवा असे विविध नियमांचे प्रबोधन करण्यात आली आहे. यामध्ये वाहन चालकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. करमाळ्यातील कार्यक्रमात उपनिरीक्षक प्रवीण साने, सहाय्यक फौजदार ओमप्रकाश पाटील, पो.शि. चंद्रकांत ढवळे, माजिद शेख, अक्कलकोट मधील कार्यक्रमात सहाय्यक फौजदार हणमंत गायकवाड, पोना महेश गायकवाड, स्वप्निल कोळी, पंढरपूरच्या कार्यक्रमात सहाय्यक फौजदार जगदीश कोरीशेट्टी, शिवाजी साठे, सागर ढोरे पाटील वैराग येथील कार्यक्रमात तानाजी मुदगल, रवींद्र माळी यांची उपस्थिती होती.

# पत्नीच्या मयतीला आला व मार खावून गेला

## उल्हासनगरमध्ये सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितीचे आत्महत्या

**उल्हासनगर/प्रतिनिधी**

संशय हा किती खतरनाक असतो हे नेहमी दिसुन येतो. संशयामुळे घराची राखरांगोळी होते. संशयामुळे माणसे मरतात. परंतु संशय मरत नाही असाच एक प्रकार अंबरनाथ पुर्व येथील बी कॅबिन रोडला राहणाऱ्या अविनाश तिमनपेट यांच्या परिवारात घडला आहे. अविनाश यांची बहिण सुषमा हिने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तेव्हा तिच्या अंत्यविधीला सुषमाचा पती, सासु, दोन नणंद ह्या आल्या असता अविनाश तिमनपेट याने सुषमाच्या पतीला जबर मारहाण केली. तेव्हा या मारहाण प्रकरणी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन अविनाश याला अटक केली आहे.

अंबरनाथ पुर्व येथील बी कॅबिन रोड वर असलेल्या एका सोसायटीत अविनाश अशोक तिमनपेट हे आपल्या परिवारा सह राहतात. त्यांची बहिण सुषमा हिचा विवाह वडाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवर असलेल्या परिसरात राहणाऱ्या विजय चंद्रकांत गुंडाळ यांच्या सोबत झाला होता. यांचा संसार गुण्या गोविंदाने सुरु असतानाच यांच्यात काही तरी वाद निर्माण झाला. तेव्हा सुषमा ही आपल्या माहेरी म्हणजे अंबरनाथ येथे आली. दरम्यान तिने येण्याचे कारण भाऊ आई याना सांगितले किंवा नाही हे तिलाच माहिती. परंतु तिने १५ जानेवारी २०२१ रोजी राहत्या घरी गळफास घेवुन आत्महत्या केली. ही माहीती वडाळा येथे राहत असलेले पति विजय गुंडाळ, सासु गोपीबाई आणि नणंद राजश्री, संगिता याना समजताच ते सुषमाच्या अंत्यविधी करिता अंबरनाथ पुर्व येथे गेले. मात्र सुषमाच्या भावाला म्हणजे अविनाश याना संशय आला की सुषमाचा विजय व त्याच्या आई बहिणीनी छळ केला म्हणूनच तिने आत्महत्या केली असावी असा संशय आला. म्हणुन त्याच संशयावरुन अविनाश तिमनपेट याने विजय गुंडाळ यांच्या डोक्यात लाकडी स्टुल मारुन जबर जखमी केले, तर तीन अनोळखी महिला यांनी विजय गुंडाळ यांची आई गोपीबाई बहीण संगिता व राजश्री याना चपलाने मारहाण केली. दरम्यान या मारहाण प्रकरणी विजय गुंडाळ यानी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात अविनाश तिमनपेट व तीन अनोळखी महिला यांच्या विरुध्द तक्रार दाखल केली असून त्या तक्रारीवरुन पोलिसानी गुन्हा दाखल केला आहे. तर गुंह्या प्रकरणी पोलिसानी अविनाश तिमनपेट याला अटक केली आहे.

# पत्नीने परस्पर मूल बहिणीच्या नावे केल्याने तीन जणांवर गुन्हा दाखल!

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील घटस्फोटा नंतर सात वर्षीय मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या महिलेने आपल्या मुलास बहीण व तिच्या पतीच्या स्वाधीन करून ते मूल त्यांचे असल्याचे भासविणारे बनावट जन्म दाखल महानगरपालिकेतून मिळविल्या प्रकरणी मुलाच्या वडिलांनी न्यायालयात केलेल्या तक्रारी नंतर भिवंडी शहर पोलीस ठाण्यात मुलाच्या आई, मावशी व तिच्या पती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत हकीकत अशी की सिराज अहमद अन्वर अली अन्सारी याने ऑक्टोबर २०१३ मध्ये पत्नी यास्मिन मोहम्मद हुसेन अन्सारी हिच्या पासून घटस्फोट घेतला होता .त्यावेळी त्यांच्या सहा महिन्यांच्या मोहम्मद अर्श या मूलाच्या पालनपोषणाची जबादारी आई यास्मिन हिने स्वीकारली होती. दरम्यान यास्मिन हिने सोमा नगर धामणकर नाका परिसरात राहणारी आपली बहीण सबा नसरीन अन्सारी व तिचा पती फिरोज (गुड्डू) निजाम अन्सारी यांच्या ताब्यात आपले मूल देऊन त्यांच्या सोबत संगनमत करून बनावट कागदपत्रे बनवून ते मूल आपले असल्याचे भासवून महानगरपालिका दप्तरी तशी नोंद करून मुलाचा खोटा जन्मदाखला मिळविला . आपले मूल घटस्फोटित पत्नीने परस्पर आपल्या बहिणीस दिल्याची माहिती समजताच सिराज अन्सारी याने भिवंडी न्यायालयात तक्रार करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली असता पोलीस तपासात ते निष्पन्न झाल्याने भिवंडी शहर पोलीस ठाण्यात पत्नी यास्मिन मेव्हणी सबा नसरीन व तिचा पती फिरोज यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# अन्न आणि औषध ग्राहक वेलफेयर कमिटीचे उपाध्यक्ष डॉ.शशिकांत बामणे यांचे जनतेस सतर्क राहण्याचे आवाहन

**वसई/प्रतिनिधी**

आमची संस्था अन्न आणि औषध ग्राहक वेलफेयर कमिटीच्या मार्फत सामाजिक हित, आरोग्य, प्रदुषण, अश्या अनेक विषयावर जातीने लक्ष घालून आमचे पदाधिकारी संपूर्ण महाराष्ट्रात कायद्याच्या कक्षेत राहून काम करत आहेत, हे काम करत असताना आम्हाला खुप नव नाविन अनुभव येत आहेत जेने करुण आपले पर्यावरण, अन्न धान्य मधे भेसळ, रस्त्याच्या कडेला मिळनारे खाद्य पदार्थ, मिठाई ची दुकाने (अनेक ठिकाणी मिठाई वर एक्सपायरी डेट मेंशन नाही, अनेक ठिकाणी fssai चे लायसेंस नाहीत, अस्वछता, असे अनेक शरीरास घातक असलेले पदार्थ, अनेक कंपन्याचे दूध, मिनरल पानी, अश्या अनेक वस्तु बिनधास्त पणे विक्रिस ठेवल्या जात आहेत. आणि म्हणूनच आमची संस्था व् संस्थेचे पदाधिकारी शासन आणि ग्राहक यांच्या मधील दुवा बनून सामाजिक काम करत आहे. तरी देखील आमचे प्रामाणिक जनतेस आवाहन करतो आहोत की जर आपण कुठेही खरेदी करा परंतु डोळे सतर्क उघडे ठेवून आपण आपली खरेदी करा, खरेदी करत असताना आपण त्या प्रोडक्ट वरील एक्सपायरी डेट नाक्कि तपासून घ्या, प्रोडक्टचे पैकिंग व्यवस्थित आहे का ते पहा, मिठाई च्या दुकानात जर खान्याचे काही पदार्थ घेत असाल तर आपण त्याना त्या वस्तुची एक्सपायरी डेट विचारा. कारण तो पदार्थ आपल्या शरीरास धोकादायक ठरु शकतो, होटल मधे देखील ज्या जी एमआरपी असेल तेवढेच पेमेंट करा, नेहमी बिल मागून घ्या, स्वछतेचा अट्टहास करा आणि जर काही आपनास चुकीचे आढळल्यास अंडर consumer protection act 2019 जे अधिकार दिले आहेत त्याच्या अंतर्गत आपण तक्रार करू शकता किंवा आमच्या संस्थेके देखील तुम्ही तक्रार करू शकता. सध्या महाराष्ट्रात अनेक इंडस्ट्रीज आहेत तिथे देखील कामगाराणा सेफ्टी राहण्याची साधने, आरोग्याच्या दृष्टिने वातावरण, त्यांचा इन्शुरन्स, स्वछता, मेडिकल हेल्प, अश्या अनेक सुविधा असने गरजेचे आहे तेव्हा कामगाराणी देखील आपल्या जीवासाठी सतर्क राहणे गरजेचे आहे, अश्या ठिकाणी जरी



आपनास काही चुकीचे आढळल्यास आपण आमच्या संस्थेच्या या नं वर. ०९९७५८७५१८९ संपर्क साधु शकता. तेव्हा आपण एक जागरूक नागरिक आहात सतर्क रहा, स्वछ रहा आपला देश सक्षम बनवा, असे अन्न आणि औषध ग्राहक वेलफेयर कमिटी महाराष्ट्राचे उपाध्यक्ष डॉ. शशिकांत बामणे यांनी कळविले आहे.

# कांताई नेत्रालयात १५ हजारावर शस्त्रक्रिया; पाचवा वर्धापदिन उत्साहात साजरा

**जळगाव/प्रतिनिधी**

भवरलाल एड कांताबाई जैन फाऊंडेशन जळगाव आणि पुणे अंध जन मंडळ पुणे यांच्या संयुक्त सहकार्यातून सुरू असलेल्या 'कांताई नेत्रालयाने' पाच वर्षात १५ हजार नेत्रशस्त्रक्रियांचा टप्पा पार केला आहे. अलीकडेच काळात नवजात अर्भकांचे दृष्टीदोष दूर करण्यासाठी आधुनिक पद्धतीने निदान व उपचार सेवेची सुरुवात करण्यात आली आहे अशी माहिती नेत्रालयाच्या मेडिकल डायरेक्टर व नेत्रविशारद डॉ. भावना अतुल जैन यां नी आज दिली. कांताई नेत्रालयाचा पाचवा वर्धापनदिन आज साजरा झाला. जैन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी पत्नी श्रद्धेय कांताबाई यांच्या स्मरणार्थ दि. १९ जानेवारी २०१६ ला नेत्रालयाचा प्रारंभ केला होता.



डॉ. भावना जैन यांनी नेत्रालयातर्फे गेल्या पाच वर्षात दिलेल्या नेत्र उपचार व शस्त्रक्रियांची आकडेवारी दिली. या नेत्रालयात गेल्या पाच वर्षात १ लाख ८० हजारांवर नेत्र रुग्णांची तपासणी करून उपचारासह इतर आवश्यक सेवा दिली आहे. यात लहान मुलांच्या नेत्रातील जन्मजात मोतीबिंदू व तिरळेपणाचा दोष दूर करण्याच्या ११४, कॉर्निया (बुब्बूळ) दोष निवारणाच्या ४८२, काचबिंदूच्या ५० हुन अधिक , रेटीना (पडद्याशी संबंधित) २७० अशा अवघड व जोखिमीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. गेल्या पाच वर्षात कांताई नेत्रालयाने खान्देशातच नव्हे तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही नेत्र तपासणी आणि उपचारासह यशस्वी शस्त्रक्रियांच्या संदर्भात उच्चस्तर गुणवत्ता आणि रुग्णसंख्येचा माईलस्टोन रोवला आहे. कांताई नेत्रालयाने जळगाव जिल्ह्यासह बुलढाणा, अहमदनगर व जालना जिल्ह्यात नेत्र शिबिरे घेतली आहेत. अशी सर्व मिळून १,२०० वर शिबिरे झाली आहेत. कांताई नेत्रालयात नेत्र विकारांशी संबंधित मोतीबिंदू, काच बिंदू, रेटीना, कार्निया, लहान मुलातील दृष्टी दोष या विकारांच्या निदान व उपचारा करिता लागणारी सर्व अद्ययावत उपकरणे व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहेत. रुग्णांना योग्य नंबरचे चष्मे, औषधी सेवाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. जन्मजात बालकात रेटीनोपैथीशी संबंधित काही दोष उद्भवला तर त्यावरही शस्त्रक्रिया व लेझर सेवा देखील उपलब्ध करण्यात आली आहे. कांताई नेत्रालयाद्वारे आतापर्यंत ४ ठिकाणी व्हिजन सेंटरची सुरूवात करण्यात आली आहे. यात जळगाव जिल्ह्यात चोपडा, पाचोरा, बुलढाणा जिल्ह्यात नांदुरा व जालना जिल्ह्यात परतूर येथे पूर्ण वेळ नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून अभिवादन!

मुंबई : शिवेसनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राची अस्मिता, मराठी माणसाचा स्वाभिमान, महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाच्या न्याय्य हक्कासाठी जीवनाच्या अखेरपर्यत संघर्ष केला. विचार आणि उच्चारांमध्ये सत्यता, स्पष्टता, पारदर्शकता असलेले ते नेते होते. प्रतिभाशाली कलावंतापासून महान राजकीय नेतृत्वापर्यतचा त्यांचा प्रवास हा त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाची साक्ष देणारा आहे. बाळासाहेबांनी त्यांच्या वक्तृत्व, नेतृत्व, कर्तृत्वाच्या बळावर मराठी मनावर कायम अधिराज्य केल. त्यांना अपेक्षित असलेला महाराष्ट्र घडविणे आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करणे हीच स्वर्गीय बाळासाहेबांना खरी आदरांजली ठरेल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वर्गीय बाळासाहेबांचे स्मरण करुन अभिवादन केले.

### आनंदवाडी साठवण तलावास लागली गळती, संबंधित विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष

देवणी : देवणी तालुक्यातील आनंदवाडी येथील साठवण तलावाच्या सांडव्याला गळती लागली आहे. मात्र याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या आनंदवाडीकरांच्या अनेक वर्षानंतर यावर्षी पूर्ण क्षमतेने भरलेल्या साठवण तलावाच्या सांडव्याला लागलेल्या गळतीमुळे. पाणी वाहून जात आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष केंद्रित करून हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे मागील अनेक वर्षापासून कोरडाठाक पडलेला आनंदवाडी साठवण तलाव यावर्षी ओसंडून वाहू लागला. त्यामुळे या गावच्या पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला. त्यामुळे ग्रामस्थांना मोठा आनंद झाला. सध्या तलाव पूर्ण क्षमतेने भरलेला आहे; मात्र सांडव्यातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे. त्यामुळे तलाव भरून देखील पाणी मोठ्या प्रमाणावर वाया जात आहे. याकडे संबंधित विभागाने वेळीच लक्ष घालून होणारी गळती थांबवावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### लातुरात युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

लातूर : शहरातील सम्राट चौक परिसरात राहणाऱ्या एका ३२ वर्षीय युवकाने स्वतःच्या घरात आडूला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घटना घडली आहे. ही घटना २२ जानेवारी रोजी मध्यरात्री बारा ते सातच्या दरम्यान घडली आहे. याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की लातूर शहरातील सम्राट चौकात राहणाऱ्या ३२ वर्षीय युवक अमर विनायक हुलगुंडे यांनी २२ जानेवारी रोजी मध्यरात्री बारा ते सकाळी सातच्या दरम्यान घरातील आडूला गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी गांधी चौक पोलिसांनी राजू हुलगुंडे यांच्या फिर्यादीवरून आकस्मात मृत्यूची गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# श्रमजीवी सेवा दलाची स्थापना; दरमहा स्वावलंबन दिन म्हणून साजरा होणार!




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुका तहसील कार्यालया समोर मंगळवारी (दि.१९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद व श्रमजीवी संघटनेच्या बोधचिन्हाच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच श्रमजीवी संघटनेचा झेंडा उभारून तरुणांनी श्रमजीवी संघटनेच्या सेवा दलाची स्थपणा केली. या वेळी उपस्थित सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालय परिसर, पोलीस ठाण्याचा परिसर व पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात स्वच्छता केली. यावेळी तहसीलदार उद्धव कदम, नायब तहसीलदार सुनील लाहंगे यांनी तरुणांच्या या उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्रमजीवी संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष जानू मोहनकर, एकलव्य परिवर्तन विद्यालयाचे प्रदीप सर, वाडा तालुका उपाध्यक्ष सुरेश पऱ्हाड, तालुका संघटक बाळा पाडोसा, तालुका सचिव, वाडा तालुका श्रमजीवी सेवा दल प्रमुख सुरज दळवी व मोठ्या संख्येने युवक-युवकी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. तरुणांमध्ये स्वछता व स्वावलंबची भावना रुजवी यासाठी श्रमजीवी सेवा दलाची स्थापना करण्यात आली असून या दलाचे कार्यकर्ते व सदस्य प्रत्येक महिण्यात एक दिवस स्वावलंबन दिन म्हणून साजरा करत शासकीय परिसराची स्वच्छता करतील.अशी माहिती विजय जाधव राज्य सरचिटणीस श्रमजीवी संघटना यांनी दिली.

# भिवंडीत क्रिकेटच्या वादातून एकावर गोळीबार

## • अवैध रिव्हॉल्वर येतातच कुठून? • रिव्हॉल्वरने पाच राऊंड फायर

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीत सेनेच्या शाखाध्यक्षासह एका महिलेवर गोळीबार झाल्याची घटना ताजी असतांनाच क्रिकेट खेळण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मैदानाकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने गाडी मागे घेण्यावरून झालेल्या वादातून एकावर गोळीबार झाल्याची खळबळजनक घटना भिवंडीतील पायगाव गावात शनिवारी सायंकाळी घडली आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान हा हल्ला पूर्व वैमनस्यातून झाला आहे का त्यानुषंगाने देखील पोलीस तपास करीत आहेत.

प्रफुल तांगडी असे या गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून पायगाव



येथे फोर्टी प्लस क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या क्रिकेट ग्राऊंडकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने जखमी व हल्लेखोर यांच्या गाड्या समोरासमोर आल्या असता गाड्या मागे घेण्यावरून दोन गटात शाब्दिक बाचाबाची झाली. ''आधी तू गाडी मागे घे, आधी तू गाडी मागे घे'' अशी जोरदार बाचाबाची झाल्यांनतर या बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले व त्यांनतर एका तरूणानाने चक्क प्रफुल याच्यावर रिव्हॉल्वरने पाच राउंड फायर केले. या गोळीबारात प्रफुल गंभीर जखमी झाला असून त्याच्या छातीवर, पोटावर व हातावर तीन गोळ्या लागल्या असल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. त्यास उपचारासाठी ठाण्याच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे . तर गोळीबार करणारा हल्लाखोर तरुण फरार झाला असून भिवंडी तालुका पोलीस त्याचा कसून शोध घेत असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग यांनी दिली आहे. दरम्यान भिवंडीत लागोपाठोपाठ गोळीबाराच्या घटना घडत असल्याने हल्लेखोरांजवळ हे अवैध रिव्हॉल्वर येतातच कुठून असा प्रश्न सुज्ज्ञ नागरिकांना पडला असून पोलीस प्रशासन याविरोधात कठोर भूमिका का घेत नाहीत असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

पान १ वरून....

### निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाचा...

एव्हरशाईन नगरी, वसंत नगरी, यशवंत नगर यासारख्या मोठ्या वसाहती उभ्या करण्यात आल्या. त्यामध्ये मोठमोठे जमीन घोटाळे झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दोन रुपये पाच रुपये अशा कवडीमोल भावाने जमिनी घेऊन या वसाहती उभ्या करून अब्जावधी रुपये ज्यांनी कमावले ते बिल्डर आणि त्यांना करोडो रुपये घेऊन बेकायदा बांधकाम परवाने देणारे तत्कालीन सिडको नगर परिषद आणि आता पालिका अधिकारी यांच्यावर ईडी कधी कारवाई करणार? असा सवाल वसई-विरारची जनता विचारीत आहेत. स्थानिक सत्ताधारी पक्षाच्या नावावर आजही अनेक मोठे बिल्डर ग्रुप मोठमोठे हौसिंग प्रकल्प उभारीत आहेत आणि त्यातून करोडो रुपये कमवत आहेत आणि हि सगळी बेहिशोबी मालमत्ता त्यांच्याकडे आहे. ती ईडीला दिसत नाही का? मग त्यांच्यावर ईडी कधी छापे टाकणार? असा सवाल इथल्या काही सामाजिक संघटनांनी केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्यांची सत्ता असेल त्यांच्या आडून बेकायदेशीर गोष्टी करायच्या आणि बाजूला व्हायचे हेच धोरण इथल्या बड्या बिल्डरांचे असल्याने ईडीने अगोदर त्यांच्यावर छापे टाकायला हवे होते आणि नंतर विवाकडे मोर्चा वळवायला हवा होता असे इथल्या जनतेचे म्हणणे आहे. एचडीआयएलचे संचालक राकेश वाधवान व सारंग वाधवान हे पीएमसी बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी आहेत. पीएमसी घोटाळ्यात ५ ते ६ कोटींचे मनीलॉड्रींग झाले असून त्यातील १६० कोटी रुपये बेकायदेशीरपणे विवा कंपनीत गुंतवण्यात आल्याचा संशय ईडीला आहे आणि हा सगळा व्यवहार एचडीआयएलची उप कंपनी असलेल्या गुरुआशिष कन्ट्रक्शन कंपनीचे माजी संचालक प्रवीण राऊत यांच्या माध्यमातून घडल्याचे बोलले जाते आणि म्हणूनच विवा ग्रुपच्या सहा ठिकाणांवर शुक्रवारी ईडीने धाड टाकली. या धाडीत ७३ लाखांची रोकड तसेच काही महत्वपूर्ण कागदपत्र ईडीच्या हाती लागली. यावेळी विवा होम्सचे व्यवस्थापकीय संचालक मेहुल ठाकूर तसेच मदन चतुर्वेदी ताब्यात घेऊन त्यांची चार तास चौकशी करून त्यांना अटक करण्यात आली. शनिवारी त्यांना न्यायालयात हजार केले असता न्यायालयाने त्यांना २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. या व्यतिरिक्त शनिवारी कुठेही छापा टाकण्यात आला नाही किंवा कुणालाही समन्स बजावण्यात आले नाही. मेहुल ठाकूर हे आमदार हितेंद्र ठाकूर यांचे पुतणे आहेत. तर विवा कंपनी ठाकूर कुटुंबाची आहे. मात्र हितेंद्र ठाकूर या पूर्वीच विवा कंपनीतून बाहेर पडले आहेत. तसेच पीएमसी बँक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी प्रवीण राऊत यांना हितेंद्र ठाकूर यांनी यापूर्वीच आपल्यापासून दूर केलेले आहे आणि काही काळापासून त्यांचा राऊत यांच्याशी दुरांवयही संबंध नसल्याचे समजते. राऊत यांची ७२ कोटींची मालमत्ता यापूर्वीच ईडीने जप्त केली आहे. पीएमसी बँक घोटाळ्याचा तपास करताना राकेश वाधवान यांनी एस बँकेने एका मॅक्स स्टार प्रा. लिमिटेड कंपनीला मंजूर केलेले २०० कोटी रुपयांच्या कर्ज व्यवहारातही घोटाळा केल्याची माहिती ईडीला मिळाली आहे. मॅक्सस्टार कंपनीच्या अंधेरीतील दोन मालमत्ता एचडीआयएलने विवा कंपनीची उप कंपनी विवा होल्डिंग कंपनीकडे फिरवल्या. त्यासाठी विवा होल्डिंग कंपनीने या मालमत्ता ३४.३६ कोटींना विकत घेतल्याचा आभास निर्माण करण्यात आला. ही रक्कम ३७ धनादेशाद्वारे अदा करण्यात आली. पण प्रत्यक्षात ती मॅक्सस्टारच्या खात्यात आली नाही. तसेच विवाच्या खात्यावरुन्ही या रकमेचे व्यवहार झाले नाहीत. पीएमसी बँकेत ६६७० कोटींचा घोटाळा झाला. या घोटाळ्यात एचडीआयएल मुख्य आरोपी आहे आणि या कंपनीशी संबंधित कंपनी सांभाळणाऱ्या प्रवीण राऊत यांना विवा ग्रुपला निधी वळवण्याच्या प्रकरणात संशयित म्हणून पाहिले जात आहे. ईडीच्या माहिती नुसार प्रवीण राऊत यांनी ९५ कोटींपैकी १ कोटी ६० लाख रुपये आपल्या पत्नीच्या खात्यावर ट्रान्स्फर केले होते. त्यातीलच ५५ लाख रुपये पुढे संजय राऊत यांच्या पत्नी वर्षा राऊत यांना देण्यात आले होते. या प्रकरणी वर्षा राऊत यांचीही चौकशी झाली असे हे एकंदरीत सगळे प्रकरण आहे.

### संशयामुळे तिघांनी कुणाचेच नाही ...

नदीपात्राजवळ घडली आहे. संजय महादेव गोरवे (वय २३, रा. टाकळी (टेंभुर्णी),ता.माढा, जि. सोलापूर) असे निर्घृण हत्या झालेल्या युवकाचे नाव आहे. याबाबत फिर्याद मृत युवकाची आई मंजुषा महादेव गोरवे(वय ५१, रा. टाकळी,ता.माढा,जि.सोलापूर) यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. याप्रकरणी बावडा येथील दादा कांबळे, लकी विजय भोसले, विकी उर्फ व्यकटेश भोसले व महेश उर्फ शैलेश प्रभाकर सोनवणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, मृत संजय व लकी,विकी व महेश हे एकमेकांचे चांगले मित्र असल्याने संजयवरील मित्रांचे घरी जाणे येणे होते. यातुनच संजयचे लकी, विकी व महेश यांच्या नातेवाईक असलेल्या मनिषा, बायडाबाई व निकिता (नावे बदलुन ठेवली आहेत) यांच्याशी ओळख होऊन त्याचे जवळकीमध्ये रूपांतर झाले होते. जवळकीचा फायदा घेत वरील तिन्ही महिला संजय याला छोट्या-मोठ्या कामासाठी घरी बोलवत असत व त्याच्या गाडीवर बसुन फिरत त्यांची कामे करून घेत होत्या. यावरून संजय व त्यांच्यात जवळकीचे संबंध असल्याचा संशय त्याचे मित्र लकी, विकी व महेश यांना आला. त्यातून त्यांनी संगनमताने संजयचा कायमचा काटा काढण्याचे ठरविले. त्याच उद्देशाने आरोपी मित्रांनी संजयला बावडा येथील त्यांचे काका दादा कांबळे यांच्या घरी जेवणाचा कार्यक्रम असल्याचे खोटे निमंत्रण देत रविवारी संध्याकाळी बावडा येथे बोलावुन घेतले होते.निमंत्रण दिले. व रात्रीच्यावेळी भीमानदीच्या गारअकोले पुलाजवळील नदीपात्राजवळ नेत धारदार हत्याराने संजय याचे दोन्ही हात, दोन्ही पाय व डोके धडावेगळे करत त्याचा निर्घृण खून केला. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तोडलेले शरीराचे अवयव इतरत्र फेकून देत नंतर मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी त्याची भीमानदीच्या पात्रात विल्हेवाट लावली. संजय बावडा येथे मित्राच्या घरी जेवायला गेला तो परत न आल्याने फिर्यादी यांनी दुसऱ्या दिवशीपासुन शोधाशोध सुरू करून संजय बेपत्ता असल्याबाबतची तक्रार टेंभुर्णी पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि.१९) रोजी दाखल केली होती. बेपत्ता संजयचा सर्वत्र शोध सुरू असताना गावातील एकाचा फिर्यादी यांच्या पुतण्याला फोन आला व गारअकोले पुलाजवळ भीमा नदीपात्रात एक प्रेत तरंगत असल्याचे सांगितले. या ठिकाणी फिर्यादी यांचे पतीसह नातेवाईक व ग्रामस्थ यांनी प्रत्यक्ष जात पाहणी केली असता पाण्यात हात,पाय व डोके नसलेले प्रेत आढळुन आले. तिथे आढळलेले चप्पल, मृतदेहाच्या अंगावरील काळ्या रंगाची बरमुडा पॅन्ट व जन्मत: असलेल्या खुनावरून तो फिर्यादी यांचा मुलगा संजय याचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर इंदापूर पोलिसांनी अवघ्या दोनच तासात या गुन्ह्याचा छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास इंदापूर पो.निरीक्षक नारायण सारंगकर करत आहेत.

### २० वर्षाने लहान असलेल्याला जवळ...

ज्येष्ठ अभिनेत्री जया पाटील यांची शनिवार, दि. १६ रोजी मध्यरात्री राहत्या बंगल्यामध्ये अज्ञाताने गळा चिरून हत्या केली होती. या घटनेमुळे सिनेक्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली होती. शहर पोलीस ठाण्यातील दोन पथके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक या खूनप्रकरणाचा तपास करत होते. गत चार दिवसांपासून पोलिसांनी तहान, भूक, हरवून तपासाला सुरूवात केली. अभिनेत्री जया पाटील यांच्या मोबाईलवर वारंवार फोन करणाऱ्या व्यक्तींचीही पोलिसांनी कसून चौकशी केली. यातूनच काही महत्त्वाची माहिती शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी आनंत पेडणेकर याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरूवातीला त्याने जुजबी माहिती देऊन पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला पोलीसीखाक्या दाखविताच त्याने क्षणाचाही विलंब न करता खुनाची कबुली दिली. अभिनेत्री जया पाटील या अनैतिक संबंध ठेवण्यास जबरदस्ती करत होत्या. त्यामुळेच त्यांचा खून केल्याचे पेडणेकरने पोलिसांना सांगितले. पेडणेकरची आणि अभिनेत्री जया पाटील यांची काही महिन्यांपूर्वीच साताऱ्यात ओळख झाली होती. या ओळखीतूनच जया पाटील या त्याला फोन करून घरी बोलवत होत्या. घटनेदिवशीही पेडणेकर घरी आला. नेहमीसारखीच जया पाटील यांनी जबरदस्ती केल्याने पेडणेकरने त्यांचा चाकूने गळा चिरल्याचे तपासात समोर आले. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक धीरज पाटील, सहायक पोलीस अधीक्षक ऑचल दलाल, पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सी.एम. मछले, पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम, हवालदार प्रशांत शेवाळे, अविनाश चव्हाण, शिवाजी भिसे, संदीप आवळे, गणेश घाडगे, अभय साबळे, संतोष कचरे, विशाल धुमाळ, गणेश भोंग यांनी या कारवाईत भाग घेतला. अभिनेत्री जया पाटील यांचे फोनवर अनेकांचे संभाषण होत होते. त्यामुळे खुनाचा छडा लावणे पोलिसांसमोर आव्हान होते. जया पाटील यांना ज्यांचे वारंवार फोन आले. त्यांच्याकडे पोलिसांनी कसून तपास केला. अत्यंत कौशाल्याने केवळ चार दिवसांत हा गुन्हा उघडकीस आणल्याने पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी सातारा शहरच्या गुन्हे प्रकटीकरणच्या टीमचे कौतुक केले.

### इनरवेअरच्या जाहिरातदाराने टाकले ...

टार्गेट पूर्ण होत होते. या मार्केटिंगबरोबर तो अनेकांना कर्ज देण्याचे अमिष ही दाखवत होता. तो ज्या लेडिज इनरवेअर कंपनीत कामाला होता.त्या इनरवेअरची जाहिरात करायची आहे असे सांगून तो अनेक सुंदर सेक्सी महिला तरूणीशी संपर्क साधत होता. त्यांना तो त्या जाहिरातीचे मॉडेलिंग करायचे असे सांगून त्याना त्याच्या मोबाईलवरून त्याचे न्यूड सेक्सी आणि मादक फोटो ते ही अंतर्वस्त्र आणि ब्रा घातलेले मागवून घेत असायचा.त्यासाठी तो अनेक महिलाच्यांवर तरूणीच्या वर नजर ठेवीत होता.सुरूवातीला जाहिरातीत मॉडेल म्हणून काम मिळणार असल्याने त्या तरूणीही त्याच्या संपर्कात राहू लागल्या होत्या.तो सांगेल तसेच त्या करीत होत्या. त्या तरूणींना आपली फसगत होणार आहे याची जराही कल्पना नव्हती. आजच्या मोबाईल इंटरनेटच्या जगात प्रसिध्दी ही प्रत्येकालाच पाहिजे असते. पण अशी प्रसिध्दी ही चिरकाला टिकत नाही हे त्यांना माहित नव्हते. आजच्या अशा बेभान झालेल्या तरूणींना चारित्र्याची जराही चाड नव्हती. मॉर्डन युगात एका कंपनीची जाहिरात करायला मिळणार आणि त्यासाठी लागणारे इनरवेअर आणि ब्रा ही त्या कंपनीकडून मिळत असल्याने उघडे नागडे व्हायला त्यांना जराही संकोच वाटत नव्हता.म्हणूनच त्या सुरज गवळी सांगेल त्याप्रमाणे आपल्या मोबाईलमध्ये ब्रा आणि निकरवरती फोटो व्हिडीओ शूट करून त्याला पाठवित होत्या.फ्री इनरवेअर देतो असे सांगून त्याने अनेक तरूणींना त्याने लेडिज ब्रा आणि निकर दिल्या होत्या.त्या देत असताना आम्हाला या कंपनीच्या जाहिरातीसाठी त्या इनरवेअर वापरून तुमचे अर्धनग्न फोटो अथवा व्हिडीओ त्याच्याकडून मागवू लागला होता. आजचे युग हे जाहिरातीचे युग आहे. एखाद्या कंपनीच्या प्रॉडक्टसाठी मॉडेलिंग करायला मिळावे म्हणून अनेक ललना, तरूणीचे स्वप्न असते. या मायावी फसव्या दुनियेत त्यासाठी अनेकजणी उघडया नागडया व्हायला एका पायावर तयार असतात. याची कल्पना सुरज सारख्या तरूणींना असल्याने ते अशा फसव्या योजना मार्केटिंगच्या क्षेत्रात आणीत असतात. अहमदाबाद शहर हे तसे मोठे शहर असल्याने इथे अशा तरूणींची कमतरता नाहीत हे त्याने ओळखलेले होते.त्यातच त्याचे लाघवी बोलणे समोरच्या तरूणीला भुरळ घालीत होते.त्याच्या त्या फसव्या बोलण्याला त्या सहजा सहजी फसत होत्या. एकदा त्याने नरोडा येथे व्हिडीओ शूट करणाऱ्या स्टुडीओमध्ये काम करणाऱ्या एका तरूणीला गाठले होते.त्याने तिच्यावर आपल्या लाघवी बोलण्याने छाप पाडत तिला आपण एका लेडिज इनरवेअर कंपनीचे प्रतिनिधी असून त्या कंपनीचे इनरवेअर आम्ही मॉडेलिंग करू इच्छिणाऱ्या तरूणींना मोफत देतो. परंतू त्यासाठी आमची एकच अट आहे असे सांगून तिला गंडविले होते. तिची जर मॉडेलिंग करण्याची तयारी असेल तर त्याने तिला संपर्क साधण्यास सांगितले होते. त्यानंतर आठवड्याने दुसऱ्या मोबाईल क्रमांकावरून तिच्याशी संपर्क साधीत तुमच्या इनरवेअरची आणि ब्रा ची काय साईज आहे. आमच्या कंपनीने तुम्हाला मॉडेलिंगसाठी निवडले आहे असे तिला सांगितले, आणि तिचा मॉडेलिंगसाठी अंदाज घेतला. ती ही नाही होय म्हणत मॉडेलिंगसाठी तयार झाली.त्यावेळी त्याने तिला आपल्या कंपनीचे लेडिज इनरवेअर मोफत पाठवून दिले आणि तिचे त्या इनरवेअरमधील अर्धनग्न काही फोटो तिच्याकडून मागवून घेतले. तिचे ते फोटो पाहून तो घायाळ झाला. ती तरूणी १८ वर्षाची असल्याने तिची ती मादक सेक्सी फिगर बघून त्याने तिच्याकडून परत तसल्याच फोटोची मागणी केली. तिने ही मॉडेलिंग करायाचे आहे म्हणून त्याला परत आपले न्यूड फोटो पाठविले. तिच्यासारख्या मादक सेक्सी तरूणीची फिगर बघून त्याची नियत फिरत होती. तो आता आंबटशौकीन बनला होता. मादक ललना आपल्यासमोर नग्न होतायेत याचा त्याला मनातून आनंद होत असायचा. त्यांना उपभोगण्याची त्याना अंगाखाली घेण्याची संधी तो शोधू लागला होता.पण तसे त्याचे एवढे धाडस होत नव्हते. फ्री लेडिज इनरवेअर त्याना देवून तो त्याचेवर बरोबर जाळे फेकित होता.त्याच्या जाळ्यात त्या तरूणी बरोबर अडकत होत्या. यानंतर सुरज याने आणखीन तिच्या ओळखीने कोणी तरूणी मॉडेलिंग करण्यासाठी आहे का? विचारून तिच्या माध्यमातून त्याने तीन चार तरूणीना कामाला लावले. त्यानंतर तो अशा आणखीन ३० ते ३५ तरूणींना जाळयात अडकविले होते. त्या ही त्याच्या सांगण्यावरून फसत गेल्या होत्या. आता तो त्याना त्याचे ते फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करू अशी धमकी देत त्याच्याकडून वेगळीच मागणी करीत होता. ही गोष्ट ज्यावेळी त्या तरूणींच्या लक्षात आली त्यावेळी त्या सावध झाल्या होत्या. त्यातील एका तरूणीने पोलीसात धाडसाने तक्रार दाखल केल्यावर या घटनेचा पर्दापाश झाला होता. सुरज गवळी याचे ग्रॅज्युएशन पर्यत शिक्षण पूर्ण झाले होते.तो ऑनलाईन ट्रेंडिग करीत होता. त्याने या माध्यमातून अनेक फसव्या योजना बाजारात आणल्या होत्या. त्यासाठी तो एका लेडिज इनरवेअर बनवणाऱ्या कंपनीत एका चांगल्या पदावर काम करीत आहे असे सांगून तो समोरच्या तरूणी महिलाच्यावर छाप पाडत होता. मॉडेलिंग करीत असताना त्या तरूणींना तो लाखो रूपयांचे कर्ज देण्याची स्कीम ही सांगत होता. त्याचप्रमाणे तो तरूणांना ही कर्जाचे अमिष दाखवित होता. एका अनोळखी तरूणाला तर त्याने ५ लाख ८० हजार रूपयांचे कर्ज देतो असे सांगून त्याला इएमआय ॲडव्हास म्हणून पेटीएमच्या माध्यमातून त्याच्या खातेवर जमा करण्यास सांगितले.त्या तरूणाने त्याच्या सांगण्यावरून ३५ रूपये पेटीएम द्वारे जमा केले. त्यानंतर एका ग्राहकांकडून १ लाख ३५ हजार रूपयाला पेटीएमद्वारे गंडा घातला होता. त्याने अनेकांची फसवणूक केली होती. तो तरूणींच्या कडून महिलाच्याकडून आणि ग्राहकांच्या कडून अशा प्रकारे पैसे उकळत होता. दर एक दोन आठवडयांनी त्याच्याशी संपर्क साधत असताना तो आपला त्या क्रमाकांचा मोबाईल बंद ठेवित होता. त्यामुळे त्याचे लोकेशन ही सापडत नव्हते.त्या व्यक्तीचे त्याने व्याजाचे पैसे ही दिले नाहीत,शिवाय तो ते पैसे घेऊन ही बेपत्ता झाल्याची कुजबुज सुरू झाली होती.त्याने अनेकांना गंडा घातला होता. मॉडेलिंगसाठी न्यूड फोटो मागवून तो तरूणीना फसवत असल्याने अनेक जणींनी पोलीसाशी संपर्क साधला होता. या घटनेची नोंद पोलीस स्टेशनला झाल्याने पोलीस ही त्याचा शोध घेऊ लागले होते. सायबर सेलने या गुन्हायाचा तपास चालविला होता. गेली दीड दोन महिने सायबर सेल तांत्रिक तपास करत होते.त्याचवेळी ते सुरज गवळी यांच्यापर्यत पोहचले होते. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी करायला सुरूवात केली. त्यावेळी तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसांनी आरसा दाखवत पोलीसी खाक्या दाखविला असता, त्याने आपला गुन्हा कबुल केला. पोलीसांनी त्याच्या विरोधात भा.दं.वी.कलम फसवणूक ४२०, ४०६ विश्वासघात करणे, ३५४ डी नजर ठेवणे, ५०० मानहानी तसेच माहिती तंत्रज्ञानाच गैरवापर करणे या गुन्हयाखाली अटक करून त्याच्या विरोधात गुन्हा नोंदवून त्याला मा. कोर्टासमोर उभे केले असता. मा. कोर्टाने त्याची रवानगी पोलीस कोठडीत केली होती. या घटनेचा पुढील तपास सायबर सेलचे पोलीस करत आहेत. एखाद्याची फसवणूक करीत असताना कोण कुठल्या माध्यामांचा कसा उपयोग करेल हे काही सांगता येत नाही. आपली फसगत झाली आहे हे लक्षात आल्यावरच ते जागे होत असतात.सुरज गवळी याच्या सारखे सुशिक्षीत तरूण देखिल माहिती तंत्रज्ञानाचा गैरवापर करीत अनेक लोकांना गंडा घालत असतात. त्याने तर महिला तरूणीना फ्री इनरवेअर देवून त्याना मॉडेलिंगसाठी तयार केले आणि त्यांचे न्यूड फोटो मागवून त्यानाच तो ब्लॅकमेल करू लागल्यावर ही घटना उघडकीस आली. या जगात प्रसिध्दी ही वाऱ्यावर उडून जाते पण चिरकाल टिकते ते चारित्र्य हे मॉर्डन युगात वावरणाऱ्या तरूणीना समजून येत नसल्याने त्या आशा मोहजालात अडकत असतात. आणि इथेच त्यांची फसगत होत असते.हेच या घटनेवरून दिसून येते.

### उधारीचे पैसे देण्यास नकार दिला...

त्यातच काल रात्रीच्या ११ वाजल्याच्या सुमाराला श्रीदेवी ज्वेलर्स दुकानाच्या शेजारी असलेल्या रिजवान सेठ यांच्या गाळ्यात मृत निजामुद्दीन फळे विक्री करीत होता. त्याचवेळी आरोपी अंसार उर्फ पप्पू आणि सद्दाम हुसैन यांनी स्ट्रॅबेरी व फळं विक्रीसाठी घेतलेले उसनवारीचे पैसे मागितले. मात्र उधारीच्या पैश्यातून पुन्हा वाद निर्माण होऊन आरोपींनी लाकडांच्या दांडक्याने हल्ला केला. या हल्ल्यात निजामुद्दीन राईन याचा मृत्यु झाला. याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात मोहम्मद ताज छोट्टन राईन याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघा हल्लेखोराविरोधात भादंवि कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक एन.एम.घोळकर करीत आहेत.

पान ८ वरून....

### श्रीराम मंदिर निधी संकलन रॅलीस ...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिर उभारणीच्या भुमिपुजनाचा सोहळाही पार पडलेला आहे. कोट्यावधी रुपय खर्च करून अयोध्या येथे श्रीराम मंदिर उभारण्यात येते आहे. या मंदिर उभारण्याच्या कार्यात देशातील प्रत्येकाचा हातभार लागावा याकरीता देशभरात निधी संकलन अभियान राबविण्यात येत आहे. श्रीराम मंदिर उभारण्यासाठी अनेकांनी वेगवेगळ्या माध्यमातून आहुती दिलेली आहे. प्रत्यक्षात आता श्रीराम मंदिर उभारण्यात येत असल्याने देशातील नागरीकांने निधीच्या माध्यमातून आपली आहुती द्यावी याकरीताच या निधी संकलन अभियानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याचाच एक भाग म्हणून लातूर येथे श्रीराम मंदिर निधी संकलन रॅलीचे आयोजन भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी यांच्या पुढाकारातून करण्यात आलेले होते. गोलाई येथून आई जंगदंबेचा आर्शिवाद घेऊन सुरु करण्यात आलेल्या या रॅलीत भजनी मंडळ, ढोल पथक, पथनाट्य पथक यांच्यासह अनेक वेगवेगळी पथके सहभागी झालेली होते. जय श्रीरामच्या घोषणानी ही रॅली दुमदुमून गेलेली होती. विशेष म्हणजे या रॅलीत महिलांचा सहभागही लक्षणीय होता. या रॅलीमध्ये विश्व हिंदु परिषदेचे अखिल भारतीय संघटन मंत्री प्रशांत हरताळकर, विनोद कुचेरीया, अनिल जोडदळेकर, अक्षय गुजर, महेश उपाध्याय, शिवदास मिटकरी, प्रणव रायचुरकर यांच्यासह भाजपाचे शहरजिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, स्थायी समिती सभापती ॲड. दिपक मठपती, महेश कौळखेरे, नगरसेवक सुनिल मलवाड, राजु आवस्कर, परिवहन सभापती मंगेश बिराजदार, भाजयुमोचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, संतोष भालेराव, ॲड. दिग्वीजय काथवटे, गणेश हेड्डा यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, भाजपाचे पदाधिकारी व श्रीराम प्रेमी नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. या रॅलीच्या माध्यमातून मंदिर उभारणीसाठी लातूरकरांनी सढळ हाताने निधी देऊन आपला हातभार लावला आहे. गोलाई येथून सुरु झालेली ही रॅली सराफ लाईन, कामदार रोड, हनुमान चौक, गोलाई, सुभाष चौक मार्गे केशवराज मंदिर येथे विसर्जीत करण्यात आली.

### मजुरांची उपस्थिती वाढविण्यासाठी ...

आवश्यक आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेच्या संयोजनातून शरद पवार ग्रामसमृध्दी योजना राबविण्यात येत आहे. शेतीसोबत शेती पूरक व्यवसायाला चालना मिळावी, ग्रामीण आर्थिक चक्राला चालना मिळावी यासाठी ही योजना आणण्यात आली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील रोजगाराची मागणी पूर्ण होणार आहे. मनरेगा योजनेच्या माध्यमातून शरद पवार ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत ४ वैयक्तिक कामांचा समावेश करण्यात आला आहे. ही योजना सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे, शेळीपालन व शेड बांधणे, कुक्कुटपालन व शेड बांधणे, भूसंजीवनी नाडेप कंपोस्टींग यांचा समावेश या योजनेत केला असून या योजनेत शेतकऱ्यांना भरीव अनुदान मिळणार आहे.महाराष्ट्रात अनेकवेळा पावसामुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसान होते. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भ या भागात सतत ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसान होते, त्यावेळी ही योजना लाभदायक ठरणार आहे. शेतीपूरक व्यवसायातून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल आणि शेतीसाठी उत्तम प्रकारचे सेंद्रीय खत निर्माण होईल असेही श्री. बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

25 JAN TO 01 FEB 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 23/01/2021 8:35 PM Page 1



# मंगळवेढा येथे ३५ लाखांचे दागिने लंपास करणाऱ्या ४० एकरच्या शेतमालकाला अटक



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे वास्तुशांतीच्या कार्यक्रमासाठी एकत्र जमलेल्या नातेवाईकांचे ३५ लाखांचे सोन्याचे दागिने पळविणाऱ्या ४० एकराच्या शेतमालक चोरास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद करून त्याच्याकडून चोरीस गेलेल्या सर्व मुद्देमाल जप्त केल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

सर्वेश्वर दामू शेजाळ (३५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दहा दिवसापूर्वी संजय महादेव आवताडे यांच्या नवीन घराच्या वास्तुशांतीचा कार्यक्रम झाला. त्यावेळी त्यांचे नातेवाईक फिर्यादी विनायक माधवराव यादव (४१) हे सहकुटुंब आले होते. त्याच दिवशी आवताडे यांच्या घरी तामदर्डी येथील रंगसिद्ध देवाची पालखी आली होती. यातील फिर्यादी व त्यांचे नातेवाईक हे पहिल्या मजल्यावर थांबले होते. हॉलमध्ये दुपारी बारा वाजता रंगसिद्ध देवाची पूजा चालू झाल्याने पूजेसाठी फिर्यादी व इतर नातेवाईक गडबडीने सोबत आणलेल्या बॅग व इतर साहित्य आहे त्या स्थितीत सोडून खालच्या हॉलमध्ये पूजेसाठी गेले. पूजा झाल्यानंतर फिर्यादी हे त्यांच्या पाहुण्यांच्या गाठीभेटी घेतल्यानंतर जेवण करून पहिल्या मजल्यावर गेले असता. बॅगेतील सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे दिसून आले. याप्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाण्यात चोरीची फिर्याद दाखल करण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने व्हिडिओ शुटिंग व सीसीटीव्ही कॅमेरेची तपासणी केली. त्यावरून एक अनोळखी संशयित व्यक्ती हा त्यादिवशी घरामध्ये वावरत असल्याचे दिसून आले. त्याची माहिती काढून दामाजी चौकातून त्यास ताब्यात घेतले. त्याने सुरुवातीला उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर मात्र त्याने पहिल्या मजल्यावरील बेडरूम मधील बॅगेतून सोन्याचे दागिने असलेले पाउच व पैशाची पर्स चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून सोन्याचे नेकलेस, पोहे हार, गंठण, बाजूबंद, पाटल्या, बांगड्या, कडा, अंगठ्या, कानातील लटकन, टॉप्स, झालर, कानातील बाली, नथ, सोन्याचे बिस्कीट असा एकूण ८५९ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे पैंजण व रोख रक्कम १० हजार रुपये असा एकूण ३५ लाख २६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदर कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, पोलीस हवालदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड यांनी केली आहे. शेतातील बांधावर पुरून ठेवला होता सोन्याची दागिने चोरलेल्या सोन्याची दागिने व रुपये आरोपीने गोणेवाडी ता मंगळवेढा येथील शेतातील बांधावर खड्डे करून पुरून ठेवले होतेते त्याने काढून दिले.

सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध मुंबई येथे चोरीचा गुन्हा दाखल असून तसेच मंगळवेढा पोलीस ठाण्यात वाळू चोरी व दारूबंदी कायद्याखाली गुन्हा दाखल आहे.

# रिक्षाचालकांसाठी कल्याणकारी महामंडळस्थापन करण्याची खा. कपिल पाटलांची मागणी

**भिवंडी/अभिजित हिरे**



तीनचाकी रिक्षाचालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी भाजपाचे खासदार कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. राज्यात गेल्या ४० वर्षापासून तीन आसनी रिक्षा हा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रमुख घटक झाला आहे. राज्यातील शहरी, निमशहरी भागाबरोबरच सध्या ग्रामीण भागातही तीन चाकी रिक्षांच्या माध्यमातून २० लाख रिक्षाचालक व्यवसाय करीत आहेत. हातावर पोट असलेल्या या रिक्षाचालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात राज्य सरकारच्या पातळीवर अनेक बैठका झाल्या. मात्र, त्याबाबत आजतागत ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, याकडे खासदार कपिल पाटील यांनी लक्ष वेधले. कोरोनाच्या आपत्तीत लाखो रिक्षाचालक-मालकांसह कुटुंबियांची फरफट झाली. या कुटुंबांना राज्य सरकारकडून कोणतेही साह्य मिळाले नाही. याउलट देशातील अन्य काही राज्यात रिक्षाचालकांसाठी पॅकेज दिले गेले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील रिक्षाचालकांना मदतीचा आधार देण्याची गरज आहे, असे खासदार कपिल पाटील यांनी सांगितले.

कल्याणकारी महामंडळाच्या स्थापनेनंतर रिक्षाचालकांना पेन्शन उपदान, भविष्यनिर्वाह निधी, वैद्यकीय मदत देता येऊ शकेल. या रिक्षाचालकांच्या माध्यमातून शासनाला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. तर केवळ विमा कंपन्यांकडे ७ हजार कोटी रुपये जमा केले जातात. त्यामुळे रिक्षाचालकांना मदत करण्याची गरज आहे. तरी रिक्षाचालकांचे कल्याणकारी मंडळ स्थापन झाल्यास रिक्षाचालकांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविता येतील, असे खासदार कपिल पाटील यांनी पत्रात म्हटले आहे. या संदर्भात योग्य कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यालयातून कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### देवणी तालुक्यात बहुतांश ग्रामपंचायतीत प्रस्थापितांना धक्का

**देवणी** : देवणी तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीच्या पार पडलेल्या मतदानाचा निकाल सोमवार दि.१८ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ च्या दरम्यान तहसील कार्यालयात लावण्यात आलेल्या ९ टेबलवर १२ फेरीत मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली. यात तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतीच्या प्रस्थापितांना मतदारांनी धक्का दिला असल्याचे चित्र हाती आलेल्या निकालावरून स्पष्ट होते. तालुक्यातील चर्चेत असलेल्या वलांडी, कवठाळ, अचवला, अंबानगर, आंबेगाव,भोपणी, अनंतवाडीसह बहुतांश ग्रामपंचायत प्रस्थापितांना मतदारांनी धक्का दिला आहे. यावेळी तालुका निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी अच्युत पाटील, नायब तहसिलदार शेख हिसामोद्दीन, नायब तहसिलदार एस.एस. माडजे, पोलीस निरीक्षक सी एच कामठेवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पंकज शिणगारे, पोलीस उप निरीक्षक रंजित काथवटे, यांच्यासह आदी अधिकारी व कर्मचारी यांनी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व पारदर्शी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

### बुलढाणा जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्यकेंद्र व उपकेंद्रांना जानेवारीपर्यत मंजुरी द्यावी -राजेश टोपे

**मुंबई** : बुलढाणा जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्यकेंद्र आणि उपकेंद्रांना जानेवारी अखेरपर्यत मंजुरी देण्याची प्रक्रिया पुर्ण करावी. ज्या उपकेंद्रांचे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे काम सुरु आहे त्यांना जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून निधी देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात यावे अशा सूचना आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिल्या. अन्न व औषध प्रशासन मंत्री व बुलढाण्याचे पालकमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य संस्थांविषयक आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी आरोग्यमंत्री टोपे बोलत होते. बैठकीस आरोग्य विभागाच्या सचिव निलम केरीकट्टा, आयुक्त डॉ.रामास्वामी, संचालक डॉ.अर्चना पाटील, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सह आयुक्त डॉ.सतीश पवार आदी उपस्थित होते. यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपुर, मोताळा, कोथळी आदी ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांच्या सद्य:स्थितीबाबत आढावा घेण्यात आला. सध्या जिल्ह्यात सात प्राथमिक आरोग्यकेंद्र आणि १२ उपकेंद्र नव्याने मंजूर करण्यात आले आहे. ज्या उपकेंद्रांना जागा उपलब्ध नाही त्यांची यादी करुन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करुन त्याविषयी तातडीने बैठक घेण्याचे सांगावे. जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून आरोग्य संस्थांच्या कामांना निधी मिळण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आणि लोकप्रतिनिधींना प्रत्र देण्यासंदर्भात आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

### उमरगा येथील अज्ञात हल्लेखोरास तात्काळ अटक करण्याची मागणी

**लातूर** : जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश सहसचिव शिवमुर्ती सारीकाताई अंबूरे यांच्या मुलावर अज्ञातांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना उमरगा येथे घडली त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन मराठा सेवा संघ जिल्हा शाखा लातूर व अखील भारतीय छावा संघटनेच्यावतीने जिल्हा पोलिस अधिक्षकाकडे करण्यात आले.उमरगा येथील रहिवासी व जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश महासचिव सारीकताई अंबुरे यांच्या १४ वर्षीय मुलावर अज्ञातांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली यामध्ये सारीकाताई अंबुरे यांच्या मुलाला गंभीर ईजा झाली असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. यांच्या कुटुंबियांनाही अज्ञातांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे लातूरचे जिल्हा पालिस अधिक्षक यांना निवेदन देवून या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक व कुटुंबियांना तात्काळ संरक्षण देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन मराठा सेवा संघाचे जिल्हाअध्यक्ष प्रा.सुनील नावाडे, अखील भारतीय छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील, भगवान दादा माकने, आकाश पाटील, प्रा.उपाध्यक्ष लिंबराज सुर्यवंशी,आम्रपालिताई सुरवसे, प्रवीण देशमुख, खंडेराव गंगणे,संभाजी नवघरे, अमरदिप गुंजोटे,प्रशांत दुधभांडे, योगिता ठाकूर, अमोल माने, अमोल गायकवाड,जिजाऊ ब्रिगेड बोराडेबाई, माने ताई, सुजाता जाधव,मनीषा बोराडे आदींच्या उपस्थितीत जिल्हा पोलिस अधिक्षकांना देण्यात आले असून या प्रकरणी आरोपींना अटक नाही झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशाराही निवेदनाद्वारे विजय घाडगे यांनी दिला. या निवेदनावर अनंत सुर्यवंशी, अभिमन्यु जगदाळे, पृथ्वीराज पवार यांच्यासह इतर पदाधिकार्यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# ‘रूप नगर के चीते’ मराठमोळा चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला




‘रूप नगर के चीते’ असं लक्षवेधी शीर्षक असलेल्या मराठी सिनेमाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. आता मराठी सिनेमाचं शीर्षक असं हिंदी का? असा प्रश्न कदाचित तुम्हाला पडेल, पण त्यामागील कारणही तसंच आहे. ‘रूप नगर के चीते’ हे सिनेमाचं शीर्षक ९०च्या दशकात प्रदर्शित झालेल्या एका हिंदी सिनेमात असलेल्या ‘हम रूप नगर के चीते है, शिकार पर ही जीते है’ या गाजलेल्या संवादावरून प्रेरीत आहे. हा सिनेमा मुख्य भूमिकेत असलेले दोन चीते म्हणजेच जीवलग मित्रांवर बेतलेला असणं हे देखील शीर्षक ’रूप नगर के चीते’ ठेवण्यामागील दुसरं कारण आहे. बॉलीवुडमधील सुप्रसिद्ध फिल्ममेकर विपुल अमृतलाल शाह यांचे पुतणे संगीतकार मनन शाह यांनी एस एंटरटेन्मेंटच्या बॅनरखाली ‘रूप नगर के चीते’ या मराठी सिनेमाची निर्मिती केली आहे. प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या ‘स्कूल, कॉलेज आणि लाईफ’ या आगामी पहिल्या मराठी सिनेमाचं दिग्दर्शन करणारे विहान सूर्यवंशी हे ’रूप नगर के चीते’चं दिग्दर्शन करीत आहेत. या सिनेमात दोन मित्रांच्या कथेसोबतच मैत्रीतील आजवर कधीही न उलगडलेले काही दुर्लक्षित पैलू सादर करण्यात आले आहेत. ‘रूप नगर के चीते’ हा सिनेमा दोन बालमित्रांचा रोमहर्षक प्रवास आणि एक घटना घडल्यानंतर त्यांचं दोन भिन्न शहरांतील विरोधाभासी जीवन दर्शवणारा आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये या सिनेमाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ होणार आहे. या निमित्तानं मराठीतील दोन चित्यांचा ऑनस्क्रीन प्रवास आणि त्यांची अनोखी कथा प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. लक्षवेधी शीर्षक आणि उत्कंठावर्धक कथानक असलेला ‘रूप नगर के चीते’ हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# आदिम जमातीच्या बचत गटांना विटभट्टी उभारणेसाठी अर्थसहाय्य

**पालघर/प्रतिनिधी**

आदिम जमातीचे संरक्षण व विकास कार्यक्रमा अंतर्गत प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार अंतर्गत जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यातील आदिम जमातीच्या (कातकरी) विटभटटी उत्पादक गटांमार्फत आदिम जमातीचे संरक्षण व विकास करणे या उद्येशाने स्थलांतर रोखने, रोजगारनिर्मिती व विपणन व्यवस्थेचे बळकटीकरण व्हावे या उद्देशाने आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत Financial support for the productin of bricks to tribal SHGS (आदिम जमातीच्या बचत गटांना विटभटटी उभारणेसाठी अर्थसहाय्य देणे) हि योजना मंजुर करण्यात आलेली आहे. लाभार्थ्यानी खालील कागदपत्रांसह या कार्यालयात दि. २१ ते दि.२९ जानेवारी या कालावधीत विहीत नमुन्यात अर्ज सादर करावे. अटी व शर्ती तसेच कागदपत्रांबाबत तपशिल खालीलप्रमाणे : लाभार्थी गट हा नोंदणीकृत असावा,नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करावे, लाभार्थी गट हा आदिम जमातीचाच असावा, गटातील लाभार्थ्याचे जातीचे दाखले जोडण्यात यावे, लाभार्थी भाजिपाला उत्पादक गटाचा ठराव जोडण्यात यावा, लाभार्थ्याकडे विटभट्टीसाठी जमिन उपलब्ध असल्याची कागदपत्रे सोबत जोडावी, लाभार्थ्याचा रहीवाशी दाखला असावा, ग्रामसभेचा ठराव व नाहरकत दाखला, लाभार्थ्याचे आधारकार्ड व रेशनकार्ड च्या छायांकीत प्रती अर्जासोबत सादर कराव्या, बचत गटाच्या बँक पासबुकची झेरॉक्स जोडण्यात यावी, बचत गटातील प्रत्येक लाभार्थ्याचा अर्ज, बचत गटातील सर्व सदस्यांचे एकत्रित व्यवसाय करण्याचे संमतीपत्र. (सर्व सदस्यांचे स्वाक्षरीसह), विधवा, परितक्त्या, दिव्यांग लाभार्थ्याच्या भाजिपाला उत्पादक गटांना योजना मंजुर करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल, बचत गटातील लाभार्थ्याचे फोटोरजिस्टर खालिल नमुन्यात देण्यात यावे. अ.क्र. बचतगटाचे नांव, सदस्याचे नांव, जात, शिक्षण, दारीद्यरेषेचा क्रमांक, आधार क्रमांक, फोटो, स्वाक्षरी अंतिम लाभार्थी निवडीबाबतचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार यांनी राखुन ठेवण्यात आले आहेत, विहीत नमुन्याचे लाभार्थी अर्ज कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, यापुर्वीचे सर्व अर्ज बाद करण्यात आलेले आहेत. योजना कातकरी लाभार्थ्यासाठीच असल्याने कातकरी लाभार्थ्यानीच विहित नमुन्यातील अर्ज प्रकल्प कार्यालयातुन नोंदणी करुन घेवुन जावेत व पुर्ण भरुन सादर करावे.

# भिवंडी मपालिका ऑनलाईन सभा सभागृहात नगरसेवकांना प्रवेश नाकारला

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी महानगरपालिकेची ऑनलाईन महासभा मागील कोरोना काळात सभागृहात होत असताना शुक्रवारी आयोजित केलेली महासभा सभागृहात न ठेवता महापौर यांच्या सभा दालनात आयोजित करण्यात आली होती तर या सभेत हजर होण्यासाठी नगरसेवकांनी स्थायी समिती सभापती दालनात गर्दी केली होती. सध्या कोरोनाचे संकट ओसरत असताना महासभा ही सभागृहात उपस्थित राहून पार पडल्यास लोकप्रतिनिधींना आपल्या समस्या प्रश्न मांडता येतात, परंतु या ऑनलाईन पद्धतीने आयोजित केल्याने सत्ताधारी आपल्यास हवे असलेले विषय हाताळून सभागृहातील लोकप्रतिनिधीं च्या भावनांचा अपमान करीत आहेत अशी प्रतिक्रिया काँग्रेस नगरसेवक अरुण राऊत यांनी दिली आहे. ऑनलाईन महासभेत टेमघर जुना जकात नाका येथील आरक्षण क्रमांक २०३ येथे ६ हजार चौ मी भूखंडावर अग्निशामक केंद्र, नाट्यगृह, सिनेमागृह, बहुउद्देशीय सभागृह या साठी फेरबदल करावयाचा प्रस्ताव, शहरातील आर्थिक उत्पन्न वाढीच्या दृष्टीने विविध शुल्क अधिमूल्य यांची फेररचना व आकारणी, महापालिका स्थानिक संस्था कर विभागा कडील १३ - १४ ते १६ - १७ या वर्षातील स्थानिक संस्थांचे कर निर्धारण व पूननिर्धाराण या कामांसाठी सुमारे १ कोटी रुपये खर्च करून सनदी लेखापाल नियुक्त करणे या विषयावर चर्चा झाली. तर सदरची महासभा ही अवैध रित्या असून यात मजूर होणारे विषय हे आम्हांस अमान्य असल्याचे शिवसेना व काँग्रेसचे नगरसेवकांनी सांगितले या बाबत आम्ही राज्याचे नगर विकास विभागाकडे तक्रार करणार असल्याचे या नगरसेवकांनी सांगितले. त्यामुळे ही महासभा बेकायदेशीर असल्याचे नगरसेवकांनी आरोप केले.

# अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे जोमात

## दक्षिण पोलीस ठाण्याची हद्द म्हणजे सोन्याची खाण

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील मैंदर्गी, दुधनी शहरासह करजगी, जेऊर, पानमंगरूळ, तडवळ, सुलेरजवळगे, उडगी, बोरोटी, बबलाद, नागणसूर, हैद्रा, तोळणूर या पंचक्रोशीतून गुटखा, मटका, जुगार, हातभट्टी दारू, वाळू तस्करी, गांजा, देशीविदेशी बोगस दारू, चंदन तस्करी विविध गावागावांत मोठ्या प्रमाणात तस्करी वाढल्या आहेत. दुचाकी चोऱ्याचे प्रमाण पाहता तेही वाढली आहेत.

दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंदे वाढली आहेत. ही सर्व अवैध व्यवसाय पोलिसांच्या आशीर्वादाने सुरू आहेत अशी नागरिकांतून चर्चा सुरू आहे. कारण पोलीस कर्मचारी व अधिकारी धाड टाकतात. पोलीस ठाण्याकडे गुन्हा नोंद करण्यासाठी घेऊन जात असताना रस्त्यातच मलिदा मारून सोडून दिले जाते. अवैध धंदे वाल्याचे व पोलिसांची साखळी असल्याने ‘मी मारल्यासारखे करतो तू रडल्यासारखे कर’ अशी परिस्थिती या अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचा हद्दीत सुरू आहे.

अक्कलकोट तालुक्यामध्ये मटका बंद झाला होता. तो आता खुलेआम सुरू झालेला आहे. सध्या दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध प्रवाशी वाहतूक कोरोनामुळे बंद होता तो ही आता डोकेवर काढले आहे. अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या उत्साहात सुरू आहे. प्रवाशी वाहतूकीतून मिळणारे उत्पन्न कमी झाल्याने पोलीस पुरस्कृत सदरचे अवैध व्यवसायांचे प्रमाण वाढवून उत्पन्न दरमहा मागील अनेक वर्षापासून जे होते ते कायम ठेवण्यात पोलिसांना या माध्यमातून यश आल्याचे एका झिरो पोलीस मित्राकडून सांगण्यात आले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागात तडवळ, सुलेरजवळगे, आळगी, कोर्सेगाव, पानमंगरुळ, करजगी, जेऊर, दोड्याळ, अक्कलकोट स्टेशन, नागणसुर, हैद्रा, तोळणूर, दुधनी, मैदर्गी या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात हातभट्टी दारू व मटका बुक्केवाल्यानीं एंजटची दुकाने मोठ्या उत्साहात सुरू आहेत. होलसेल गुटखा विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

ग्रामीण भागातील सर्वच गावांमध्ये देखील मटका बुक्केवाल्यांनी कहर केलेला आहे. मैंदर्गी, दुधनी शहरात तर रतन खत्रीचं मटका चालवित असल्याचे चित्र आहे. दक्षिण पोलीस ठाण्यांतील अधिकारी हे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्यावर जो-तो भाग सोपवून दिल्याने केवळ महिन्यांचीच वाट पाहत बसणारे पोलीस अधिकारी हद्दीत सर्वत्र शांतता व अवैध धंदे बंद असल्याचे सांगून कोरोना या रोगावर ढकलून अवैध धंद्यांना आश्रय देण्याचे काम सुरू असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

अक्कलकोट दक्षिण, उत्तर व वळसंग पोलीस ठाण्यांकरिता असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. संतोष गायकवाड हे गडचिरोली वरून आल्याने त्यांना कामांचा अनुभव दांडगा आहे. त्यांनी अक्कलकोट येथे आल्यापासून तिन्ही पोलीस ठाण्यांस शिस्त लावण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून झाला. त्यांनाही अंधारात ठेवून पोलीस कर्मचारी अवैध धंदे बंद असल्याचे सांगून स्वतः मलिदा मारत आहेत. इतके वर्षात मलिदा मारले नसतील लॉकडाऊनच्या काळात तेवढे मारले आहेत कारण त्यावेळी मंथली नव्हतं तर डेली सुरू होता काही प्रमाणात, काही दिवस चालले मात्र नंतरच्या काळात बे चा पाढा सुरू झालेला आहे. लॉकडाऊनच्या अगोदर पाचशे रुपये मंथली होता आता पंधराशे रुपये मंथली झाला आहे.

श्रीक्षेत्र श्री स्वामी समर्थ अक्कलकोट हे राज्यातील एक नंबर तीर्थक्षेत्र आहे. मात्र वाढत्या अवैध धंद्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत एका राजकीय पक्षाच्या नेत्यांने थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य विशेष पोलीस महानिरीक्षक यांना थेट पत्र पुराव्यानिशी पाठविण्यात आलेले आहे. दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरीचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढली आहे. दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दुधनी येथील सुरू असलेले मटक्यावर धाड, सोलापूर येथील पथकाने टाकली तर हैद्रा येथे जुगार अड्ड्यावर धाड टाकून ११ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची ताजी घटना आहे. तर ही कारवाई सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी करतात मग या दक्षिण पोलीस ठाण्यातील कर्मचारी काय करतात अशी चर्चा नागरिकांतून सुरू आहे. या अगोदर ही असे अनेक गुन्हे दाखल झाले असताना गुन्हा मात्र अद्यापही कमी झालेली नाहीत उलट वाढल्याचे चित्र आहे.

या दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील पोलीस अधिकारी हे पोलीस निरीक्षक असल्याचा आव आणून सर्व काही अलबेल असल्याचे वरिष्ठांना कळवून मोठ्या प्रमाणात वरकमाई करण्यात येत असल्याची चर्चा दक्षिण पोलीस ठाण्यातून होत आहे.

वाळूमध्ये काही पोलीस अधिकारी हे भागीदार असल्याचे झिरो सुत्राकडून सांगण्यात आले आहे. दुधनी, मैदर्गी, करजगी व नागणसूर हे औट पोलीस ठाणे व जेऊर बीट मिळण्याकरिता काही पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकाऱ्यांचा नेहमीच आग्रह असतो. कारण दक्षिण पोलीस ठाण्याचे हद्द म्हणजे सोन्याची खाण म्हणण्यास हरकत नाही. याहद्दीत अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असतात. एकूणच साऊथ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गावागावातून जुगार अड्डे, मटका, हातभट्टी दारू, देशीविदेशी बोगस दारू बंद करण्याची मागणी नागरिकांतून पुढे येत आहे. याकडे पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे असेही जनतेतून व विशेष महिला वर्गातून बोलले जात आहे.

25 JAN TO 01 FEB 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 23/01/2021 9:59 PM Page 1



# श्रीराम मंदिर निधी संकलन रॅलीस लातूरकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद!

## मंदिर उभारणीसाठी सढळ हाताने लावला हातभार!



**लातूर/प्रतिनिधी**

देशातच नव्हे तर जगातील हिंदुचे स्वप्न म्हणजे अयोध्या येथे श्रीराम मंदिर उभारणी होय. या श्रीराम मंदिर उभारणीस प्रारंभ झालेला असून मंदिर उभारण्याकरीता देशातील प्रत्येक नागरीकांचा हातभार लागावा या हेतूने निधी संकलन अभियान राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून लातूर येथे श्रीराम मंदिर निधी संकलन रॅलीचे आयोजन भाजपाचे माजी शहरजिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. गोलाई येथून सुरु झालेल्या या रॅलीने तमाम लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीच्या माध्यमातून लातूरकरांनी सुद्धा राम मंदिर उभारणीकरीता सढळ हाताने निधी दिलेला आहे. गेल्या अनेक वर्षापासून अयोध्या येथे श्रीराम मंदिर उभारणीसाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न होत होते. अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर श्रीराम मंदिर उभारण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. देशाचे ...पान ६ वर




# जेऊर ग्रामपंचायतीवर पुन्हा एकदा पाटील गटाचे वर्चस्व

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात अतिशय चुरशीने झालेल्या जेऊर ग्रामपंचायत निवडणूकीकडे संपूर्ण तालुकावासियांचे लक्ष लागून राहिले होते. तेथे पुन्हा एकदा कै महादेव पाटील यांच्या अनुपस्थितीत माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांच्या गटाने ग्रामपंचायतीवर १६ उमेदवार निवडून आणून वर्चस्व सिद्ध केले आहे.तालुक्यातील ६३ ग्रामपंचायती पैकी जेऊर या ग्रामपंचायत निवडणूकीकडे मात्र संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते. कारण यंदा राज्यात काँग्रेस,शिवसेना व राष्ट्रवादी पक्ष मिळून महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना जेऊर गावात मात्र कॉग्रेस व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते एकमेकांच्या विरोधात लढताना दिसत होते.त्याच बरोबर यंदाची जेऊर ग्रामपंचायत निवडणूक हे माजी आमदार कै महादेव पाटील यांच्या निधनानंतर



पहिलीच निवडणूक झाली. जेऊर ग्रामपंचायत निवडणूकीत मल्लिकार्जुन पाटील यांचे श्री काशिलिंग ग्रामविकास पॅनल व बंदेनवाज कोरबु यांचा सर्वधर्मसमभाव ग्रामविकास पॅनल या दोनच पॅनल मध्ये सरळ लढत झाली. या जेऊर ग्रामपंचायत निवडणूकीत कोण मारणार बाजी ? आणि कोणाचा होणार पराभव, यासाठी संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते. कै महादेव पाटील यांच्या निधनानंतर जेऊर ग्रामपंचायत निवडणुकीची संपूर्ण जबाबदारी मल्लिकार्जुन पाटील यांच्यावर पडली होती. जेऊर ग्रामपंचायत निवडणूकीत कॉग्रेस एका बाजूला तर राष्ट्रवादी व भाजप एका बाजूला लढताना दिसले. एकूण सहा वार्डातून १७ जागेसाठी ३४ उमेदवार निवडणूकीच्या रणांगणात उतरले होते. या मध्ये मल्लिकार्जुन पाटील गटाचे १६ उमेदवार निवडून आले. तर सर्वधर्मसमभाव ग्रामविकास पॅनलचे बंदेनवाज कोरबु यांचे एक ही उमेदवार निवडून आले नाहीत. या निवडणुकीत मल्लिकार्जुन पाटील गटाचे श्री काशिलिंग ग्रामविकास पॅनलचे जेऊर ग्रामपंचायतीवर पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध झाले आहे. मल्लिकार्जुन पाटील यांच्यासाठी ही अस्तित्वाची लढाई तर बंदेनवाज कोरबु, मल्लिकार्जुन बामणे, इरण्णा भरमशेट्टी यांच्यासाठी प्रतिष्ठेची लढाई समजली जात होती. कारण यंदा मल्लिकार्जुन पाटील व काशिराया पाटील यांनी कै महादेव पाटील यांच्या अनुपस्थितीत ही पहिलीच निवडणूक लढवत असल्याने त्यांच्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची मानली जात होती. तर इकडे राष्ट्रवादीचे बंदेनवाज कोरबु व भाजप कार्यकर्त्या साठी ही लढाई प्रतिष्ठेची मानली जात होती. एका बाजूला अनुभवी व मातब्बर तर दुसऱ्या बाजूला नव्या दमाच्या कार्यकर्त्यांची फळी पहायला मिळत होती. अखेर जेऊर ग्रामस्थांनी पुन्हा एकदा कै.महादेव पाटील घराण्यावर विश्वास दाखविला आहे.

# बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त वाडा तालुक्यात विविध कार्यक्रम संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेनेचे सर्वेसर्वा हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या ९५ व्या वाढदिवसानिमित्त वाड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना वाडा तालुका समन्वयक प्रकाश केणे यांच्या निवासस्थानी स्व. बाळासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी स्व.मीनाताई ठाकरे, स्व.आनंद दिघे व स्व.अशोकभाई पाटील यांच्याही प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांनी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा देत मार्गदर्शन केले. तर ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप करण्यात आली. या प्रसंगी अनुष्का ठाकरे महिला व बालकल्याण सभापती जिल्हा परिषद पालघर, शिवसेना नेते निलेश गंधे, योगेश गवा वाडा पंचायत समिति सभापती, सागर ठाकरे पंचायत समिती सदस्य, वाडा नगरपंचायत नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर, नगरसेविका वर्षा गोळे, जागृती कालण, उर्मिला पाटील, नगरसेवक संदीप गणोरे, वाडा तालुका प्रमुख उमेश पठारे, प्रकाश पाटील, शहर प्रमुख प्रमोद घोलप, अरुण ठाकरे, अरुण अधिकारी, निलेश पाटील युवती सेनेच्या अलकनंदा भानुशाली, अर्चना पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने पस्थित होते.

# मल उद्दचन केंद्र बनविण्यास स्थानिकांचा तीव्र विरोध!



**भिवंडी/अभिजित हिरे**

मानसरोवर परिसरात बनविण्यात येत असलेल्या सीवेज ट्रीटमेंट प्लांट STP हा निवासी वस्तीत असल्याने त्यास विरोध होत असून त्या विरोधात मानसरोवर फुले नगर येथील नागरीकांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने करीत आपला विरोध दर्शविला आहे. भिवंडी महापालिका क्षेत्रात मागील कित्येक वर्षापासून रखडलेली भुयारी गटार योजनेची मल निस्सारण योजनचे काम आज ही अर्धवट असल्याने पूर्णत्वास जात नाही त्यातच या योजनेअंतर्गत ठिकठिकाणी बनविण्यात येणाऱ्या सीवेज ट्रीटमेंट प्लांट STP यास ही नागरिकांचा विरोध वाढत आहे. शहरातील कामतघर ताडाळी मानसरोवर फुले नगर या भागातील भुयारी गटार या मानसरोवर फुलेनगर येथील महापालिकेच्या मोकळ्या भूखं डावर बनविण्यात येणाऱ्या मल उद्दचन केंद्र या ठिकाणी जोडण्यात येणार असून तेथून प्रक्रिया होऊन पाणी पुढे खाडीस सोडले जाणार आहे .हा संपूर्ण परिसर नागरी वस्तीचा असल्याने हे केंद्र या भागात बनविण्यास मानसरोवर, फुले नगर येथील नागरिकांचा विरोध असून त्या विरोधात विनंती अर्ज, तक्रारी दाखल करून ही महानगरपालिका प्रशासन येथील प्रकल्पाचे सुरू असलेले काम बंद करीत नसल्याने मानसरोवर बचाव संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली स्थानिक रहिवाशी स्त्री पुरुष नागरीकांनी रस्त्यावर उतरून प्रशासनाचा तीव्र शब्दात निषेध केला आहे .भर नागरी वस्तीत बनविण्यात येणाऱ्या या मल उद्दचन केंद्रा मुळे स्थानिक रहिवाश्यांना दुर्गधीचा सामना अहोरात्र करावा लागणार असून येथील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होईल अशी तक्रार स्थानिक नागरीक व महानगरपालिका सभागृह नेते शाम अग्रवाल यांनी केली आहे. या आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी मोर्चा काढण्यास मनाई केल्याने मोठा पोलीस फौजफाटा आंदोलनस्थळी तैनात करण्यात आला होता. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी मानसरोवर प्रवेशद्वारा बाहेर एकत्रित होत महापालिका प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.




# पाखरसांगवी ग्रामसेवकाची बदली रद्द करण्याच्या मागणीसाठी अर्धे गाव बसले बेमुदत उपोषणाला!

**लातूर/प्रतिनिधी**

मौजे पाखरसांगवी येथील ग्रामसेवक विष्णू भिसे यांची बदली रद्द करावी या मागणीसाठी अक्षरशः लातूर तालुक्यातील मौजे अर्धे पाखरसांगवी गाव मागच्या दोन दिवसांपासून उपोषणाला बसले आहे. यामध्ये भिसे यांना षडयंत्र रचून सक्तीने रजेवर पाठविले जात असल्याचे गावकऱ्यांचे म्हणने त्यांनी एका निवेदनाद्वारे तहसिलदारांकडे व्यक्त केले आहे.

सविस्तर वृत्त असे की, ग्रामसंसद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामिण भागाच्या विकासाला चालणा देणाऱ्या ग्रामपंचायतीचा कणा असणारा ग्रामसेवक हा एक महत्वाचा घटक असतो. गेली दोन वर्षापासून पाखरसांगवी ग्रामपंचायतीमध्ये विष्णू भिसे हे अतिशय चांगल्या पध्दतीने कामकाज करत आहेत. तसेच त्यांच्या कामावर गावातील सर्वच स्तरातील नागरिक समाधानी ही होते. त्याशिवाय त्यांच्या पारदर्शक कार्यशैलीमुळे ग्रामस्तरावरील कारभार सुरळीत झालेला आहे. असे असताना चांगल्या पध्दतीने सुरु असलेल्या कामास खोडा घालण्यासाठी मोजक्या विरोधकांच्या षडयंत्रामुळे गटविकास अधिकारी यांच्याशी संगनमत करुन आर्थिक व्यवहार साधला गेला असल्याचे बोलले जात आहे. आणि यातुनच ग्रामसेवक भिसे यांची बदली करण्याचे षडयंत्र रचुन त्यांना मेडीकल रजेवर जावे किंवा कार्यालयीन चौकशीची धमकी देऊन त्यांचा चार्ज काढून घेण्यास



भाग पाडले जात आहे. तसेच ग्रामसेवक भिसे यांना गावातील कारभारातून किंवा ग्रामपंचायतीच्या कारभारातून हद्दपार करण्याचा अटहास केला जात आहे. कोणत्याही षडयंत्रातून ग्रामसेवक भिसे यांची बदली होऊ नये किंवा ती थांबवावी या मागणीसाठी मौ. पाखरसांगवी येथील ग्रामस्थांनी दिनांक १४ जानेवारी रोजी एका निवेदनाद्वारे मागणी केली होती. तसे न झाल्यास दि. २२ जानेवारी २०२१ रोजी अमरण उपोषणाला बसणार असल्याचा ईशाराही दिला होता. परंतू त्यांच्या निवेदनाला प्रतिसाद न मिळाल्याने ग्रामस्थांनी परवा म्हणजे शुक्रवार दि. २२ जानेवारी पासून अमरण उपोषण सुरु केले आहे.

सदरील उपोषणा संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्याधीकारी, पंचायत समिती सभापती, तहसिल कार्यालयाला निवेदनाद्वारे कळविले होते.

# गरजूंना जीवदान देण्यासाठी रक्तदान करा-न्या.कंकणवाडी



**लातूर/प्रतिनिधी**

रक्तदान हे जीवनदान देणारे आहे. आपल्या रक्तामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. त्यामुळे समाजातील विविध घटकांनी रक्तदानासाठी पुढे यावे,असे आवाहन न्या. सुनिता कंकणवाडी यांनी केले. रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिर प्रसंगी न्या. कंकणवाडी बोलत होत्या. प्रादेशिक परिवहन कार्यालयात हे शिबिर संपन्न झाले. या शिबिरास लातूरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अमर पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबिरासारखे उपक्रम वारंवार घेणे ही समाजाची गरज आहे. यातून खऱ्या अर्थाने समाजसेवा घडते, असेही न्या. कंकणवाडी म्हणाल्या. या शिबिरात एकूण ६५ जणांनी रक्तदान केले. यावेळी रोटरीचे सदस्य रो.राजेश सेन, रो.चंद्रकांत गुंडरे, रो.जितेंद्र कोरे, रो.गिरीश ब्याळे, रो.अजय तापडिया यांची प्रमुख उपस्थिती होती. आरटीओ इन्स्पेक्टर सचिन बंग यांच्या मार्गदर्शनात हे शिबिर संपन्न झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक जयदीप झांबरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष नंदकिशोर लोया, सचिव पुरुषोत्तम नोगजा, प्रोजेक्ट चेअरमन द्वारकादास मंत्री यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. रक्त दात्यांचे, डॉ. भालचंद्र पिढीचे व सर्व उपस्थितांचे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्रीमती पल्लवी शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मजुरांची उपस्थिती वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येणार -रोह्यो राज्यमंत्री संजय बनसोडे

**मुंबई/प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागात वेगवेगळया कामांसाठी मजुरांची आवश्यकता असते मात्र आज अनेक कामांसाठी मजूर मिळत नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे रोजगार हमी योजना विभागाच्या माध्यमातून मजुरांची उपस्थिती वाढविण्यासाठी पुढील काळात व्यापक स्तरावर जनजागृती करण्यात येणार असल्याचे रोह्यो राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. स्वयंसहाय्यता, बचत गटातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी रोजगार हमी योजनेमार्फत विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आढावा बैठक रोह्यो राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस नरेगाचे आयुक्त शंतनू गोयल, रोह्यो विभागाचे संबंधित अधिकारी यांच्यासह श्रीमती.सुरेखाताई ठाकरे यशस्विनी सामाजिक अभियानाच्या वर्षा निकम, रत्नमाला शिंदे, ज्योती पावरा, मनिषा केंद्रे, उज्ज्वला राऊत उपस्थित होते. राज्यमंत्री श्री. बनसोडे म्हणाले की, आज अनेक ठिकाणी अकुशल मजूर मिळतात पण ते कामावर येण्यास तयार नसातात. येणाऱ्या काळात मजुरांनी जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग नोंदवावा यादृष्टीने काम करण्यात येणार आहे. मजूर उपस्थिती वाढविण्यासाठी ग्रामसभा आणि बचत गट यांचाही आधार घेण्यात येणार आहे. तसेच ग्रामस्तरावरील सर्व लोक प्रतिनिधींना रोह्योबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. रोह्यो मजूरांना मजुरी विहीत कालावधीत मिळेल याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.या योजनेबाबत दर १५ दिवसांनी आढावा घेण्यात यावा. रोह्यो कामाची रक्कम मजूरांना लगेच अदा करण्यात यावी. कामाच्या ठिकाणी मजूरांना मिळणाऱ्या सुविधा उदाहरणार्थ प्रथमोपचार पेटी, पिण्याचे पाणी, पाळणाघर या सुविधा मिळतील याबाबत दक्षता घेण्यात यावी असेही बनसोडे यांनी यावेळी नमूद केले. शरद पवार ग्रामसमृध्दी योजनेतून ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळेल शरद पवार ग्रामसमृध्दी योजना यशस्वी करण्यासाठी बचत गटातील महिलांनी/प्रतिनिधींनी पुढाकार घेत ही योजना यशस्वी करणे ...पान ६ वर